
१७ सप्टेंबर १९६६ : चाळीस पैसे

# माणूस

साप्ताहिक



"शेवटी आम्हीच हे युद्ध जिंकणार"

—अध्यक्ष हो चि मिन्ह

दियेन बियेन फू चा विजेता,

उत्तर व्हिएटनामचा नेपोलियन

जनरल झॉप






# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

**पूर्वार्धाची छपाई १ सप्टेंबरला पूर्ण झाली.**

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**रा ज हं स प्र का श न**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

# माणूस

## एक समग्र साप्ताहिक

वर्ष – सहावे
अंक : अकरावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्रमैत्री

स. न. ३–९–६६

आपला अंक मी बारकाईने वाचून काढला. लेखक कोणीच 'ओळखीचे' दिसले नाहीत. पण लेख मात्र अभ्यासपूर्ण, सोज्वळ, चटकदार व उद्बोधक वाटले. डॉ. आंबेडकर हे माझे निकटचे स्नेही म्हणून रिपब्लिकन पक्षावरील लेख पुनः पुनः वाचला. काही काही ठसठशीत वाक्ये वाचता वाचता अधोरेखित केली.

मात्र भविष्ये, बुवा, स्वामी, महाराज, काँग्रेसचे मंत्री व पुढारी यांपासून समाजाला वाचवा.

**श्री. शं. नवरे, मुंबई.**

स. न. ३–९–६६

अंकातील 'मुक्ताफळे' व 'विचारवारे' ही सदरे वाचण्यासाठी मी अक्षरशः आपले अंकावर तुटून पडतो. आपले साप्ताहिक दिवसेदिवस अत्यंत लोकप्रिय होत आहे, याबद्दल कोणाचे दुमत होणार नाही.

**गोविंद गायकवाड**
मु. पो. कोठुरे, ता. निफाड, जि. नाशिक.

स. न. ५–९–६६

महाराष्ट्रीय कलोपासकांच्या अमूल्य सेवेचा केलेला यथोचित गौरव आपल्या मोठ्या मनाची साक्ष देण्यास समर्थ आहे. नाट्यकलेची या दर्जेदार संस्थेने केलेली जपणूक आणि आपल्यासारख्या रसिक व धुरंधर संपादकाने त्याचे ओळखलेले मोल ही दोन्ही सुसंस्कृततेची आणि कलात्मकतेची ग्वाही देतात.

**श्रीराम पेशकार, खामगाव**

पत्रचर्चा

# डॉ. वसंत अवसरे यांचा विवाह.....

स. न. वि. वि.

दि. २० ऑगस्ट १९६६ च्या आपल्या साप्ताहिकात आपण 'डॉ. वसंत अवसरे' यांचेबद्दल एक लेख प्रसिद्ध केलात. त्यात पान १९, २० वर छापले आहे, "फक्त हिंदू असल्याने दुसऱ्या विवाहाला कायद्याने बंदी आहे, हे लक्षात येताच त्यांनी तात्पुरता मुसलमान धर्म स्वीकारला व महाराष्ट्र सरकारची कायदेशीर फटफजिती केली."

एखाद्या हिंदूने धर्मांतर करून पहिली पत्नी हयात असता दुसरा विवाह केला तर तो विवाह कायदेशीर नाही. तो विवाहच होऊ शकत नाही. उलट विवाह झाला असे म्हणणारे जोडपे, विवाह लावणारे भटजी आणि विवाहास हजर असणाऱ्या सर्व व्यक्ती शिक्षेस पात्र आहेत. 'डॉ. अवसरे यांनी मुसलमान धर्म पत्करून विवाह केला व त्यामुळे महाराष्ट्र सरकारची फटफजिती झाली, हे विधान चुकीचे व गैरसमज पसरविणारे आहे. द्विभार्या–प्रतिबंधक कायदा हा केवळ महाराष्ट्रापुरता नाही. तो सबंध भारतातील हिंदूंस लागू आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारची कायदेशीर फटफजिती होण्याचे काहीच कारण नाही. फटफजिती होणार असेल तर ती डॉ. अवसरे, ती शिक्षित गुर्जर महिला व त्यांचे साथीदार यांचीच होईल.

विवाहित हिंदूने धर्मांतर केल्यास त्यांचा हिंदू पत्नीशी अस्तित्वात असलेला विवाह रद्द होतो काय ? धर्मांतर केल्यास अस्तित्वात असलेला लग्नसंबंध नाहीसा होतो काय ? धर्मांतर केल्याने प्रथम पत्नीचा वैवाहिक हक्क नष्ट होतो काय ? हिंदूने मुसलमान धर्म स्वीकारल्यास प्रथम पत्नी हयात असता तो दुसरा विवाह करू शकतो काय ? ह्या प्रश्नांचा थोडक्यात विचार करून वैवाहिक बाबतीतील कायद्याचे मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हे पत्र लिहीत आहे.

भारतीय दंड विधान कलम ४९४ यायोगे प्रथम पत्नी जिवंत असता दुसरा विवाह केला तर ती व्यक्ती गुन्ह्यास पात्र होते. हिंदू व्यक्तीच्या वैवाहिक जीवनास १९५५ चा हिंदू वैवाहिक कायदा लागू होतो. त्या कायद्याच्या कलम १७ प्रमाणे दोन हिंदूंमध्ये प्रथम पती किंवा पत्नी जिवंत असता जर दुसरा विवाह केला तर तो विवाह, विवाह नसून गुन्हा होतो. या कलमापासून पळवाट काढण्यास दोहोपैकी

# .....कायद्याची भूमिका कोणती ?

एका व्यक्तीने धर्मांतर करून जर दुसरा विवाह केला तर त्या विवाहास हा हिंदू विवाहाचा कायदा लागू पडत नाही असा युक्तिवाद केल्यामुळेच हिंदूने धर्मांतर केल्यानंतर त्यास दुसरे लग्न करता येईल ही कल्पना निर्माण झाली आहे व त्या अनुरोधानेच डॉ. अवसरे यांनीही आपल्या द्वितीय लग्नाचा प्रयोग केला आहे. परंतु हा युक्तिवाद कायद्यास धरून नाही असे कोर्टाने आपल्या अनेक निकालांत अगदी स्पष्ट केले आहे.

अमरनाथ विरुद्ध श्रीमती अमरनाथ, तसेच रामकुमारी विरुद्ध दुखीसिंग आणि अहिशा बिवी विरुद्ध सुबोधचंद्र चक्रवर्ती ह्या तीनही प्रकरणांमध्ये न्यायदेवतेने असा स्पष्ट निकाल दिला आहे की एखाद्या व्यक्तीने धर्मांतर केले तर त्यामुळे त्या व्यक्तीचे अस्तित्वात असलेले पूर्वीचे वैवाहिक संबंध आपोआप नष्ट होत नाहीत व उलट अशा प्रकारचा दुसरा विवाह गुन्ह्यास पात्र होतो. धर्मांतर केल्यामुळे वैवाहिक जीवनात एकच फरक पडतो व तो म्हणजे हिंदू जोडप्यापैकी जी व्यक्ती धर्मांतर करते, त्या व्यक्तीविरुद्ध लग्न रद्दबादल करण्याचा हिंदू–विवाह कायद्याच्या कलम १३ (२) प्रमाणे अधिकार मिळतो.

वरील विधानास पुष्टी देणारे काही प्रमाणित असे न्यायप्रविष्ट निकाल खालीलप्रमाणे आहेत.

पहिला महत्त्वाचा निकाल मुंबई हायकोर्टाचा आहे व तो अद्यापि अबाधित आहे.

श्री. गोसावी व त्यांची पत्नी गंगा ह्यांचा विवाह हिंदू धर्मप्रमाणे झाला. काही वर्षांनी तिने मुसलमान धर्म स्वीकारला व कासम या नावाच्या मुसलमानाबरोबर विवाह केला. न्यायमूर्ती पिन्हे व न्यायमूर्ती मेलव्हिल यांनी या बाईस दोषी ठरवून भारतीय दंड विधान कलम ४९४ खाली कारावासाची शिक्षा दिली. ठाण्याच्या मूळ कोर्टाने गंगास ३ वर्षे सश्रम शिक्षा दिली होती. (४ मुंबई ३३० पाहा.)

दुसरी केस लाहोर हायकोर्टाची आहे. नंदी ही एका हिंदू चांभाराची पत्नी. कायदेशीर धर्मांतर करून ती मुसलमान झाली व एका मुसलमानाबरोबर तिने लग्न केले. लाहोर हायकोर्टाने, मुंबईच्या हायकोर्टाप्रमाणेच निकाल देऊन त्या बाईस

[पृष्ठ ६२ वर चालू]

# विद्यार्थी परिषदेचे अधिवेशन....

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेच्यावतीने पुण्यात दोन दिवस भरलेल्या अधिवेशनाला महाराष्ट्रातील विद्यार्थी परिषदेच्या चाळीस शाखांतून २५० विद्यार्थी आले होते.त्यांमध्ये ४० विद्यार्थिनी होत्या.

परिषदेचे डोळयांत भरण्यासारखे वैशिष्टच म्हणजे उत्कृष्ट संघटन व शिस्त. दोन दिवसांच्या या अधिवेशनात सारी कामे कशी शिस्तबद्ध आणि संघटितरीत्या होत होती. आमंत्रितांचे स्वागत करण्यापासून तो समारंभ संपल्यानंतर खुर्च्या व सतरंज्या उचलून ठेवण्यापर्यंत सारे कार्यकर्ते मनापासून पद्धतशीरपणे कामे करीत होते. कुठेही बेशिस्त, आरडाओरड वा गोंधळ दिसत नव्हता.

आजकालचे विद्यार्थी वक्तृत्वावर परिश्रम घेत नाहीत, अशी साधारण तक्रार असते. पण जे या परिषदेच्या साऱ्या कार्यक्रमांना उपस्थित राहिले असतील, त्यांना आश्चर्याचा गोड धक्काच बसला असेल. तरुण तरुण विद्यार्थी व विद्यार्थिनी एकाहून एक सरस अशा पद्धतींनी अत्यंत रसाळ व प्रासादिक भाषेत बोलत होते. आपल्या भाषणांवर त्यांनी घेतलेले श्रम स्पष्ट दिसत होते.

विद्यार्थ्यांची संघटना म्हटली म्हणजे नावापुरते काही विद्यार्थी, बाकी सारा मामला प्रौढांचा आणि राजकीय पुढाऱ्यांचा दिसतो. पण या परिषदेची सारीच सूत्रे खरेखुरे विद्यार्थीच हलवीत होते. कार्यकारिणीची नावे सुचविण्यापासून तो परिषदेच्या मुख्य ध्येय-धोरणांवर महत्त्वाची मुद्देसूद भाषणे करणे या साऱ्या गोष्टी तरुण विद्यार्थी करीत होते.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी परिषदेच्या वतीने पुण्यातील परदेशी विद्यार्थ्यांचा मेळावा भरला होता. पुण्यात वेगवेगळया संस्थांतून शिकत असलेल्या २२ देशांच्या ५५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या मेळाव्यात भाग घेतला होता.

त्या दिवशी पुण्याचया शिवाजी मंदिरात एक लहानशी युनो (संयुक्त राष्ट्र संघटना) परिषद भरल्यासारखेच वाटत होते. अमेरिकन, युरोपियन, आफ्रिकन, अरबी, आग्नेय आशियाई आदी साऱ्या विभागांतले प्रतिनिधी या मेळाव्यात उत्साहाने भाग घेत होते, गाणी गात होते व हास्यविनोद करीत होते.

याच मेळाव्यात बोलताना एका आफ्रिकन विद्यार्थ्याने आपली मनींची व्यथा सांगितली. त्याने

विचारले, "तुम्ही भारतीय लोक आम्हा परदेशीयांना नेहमी दूर दूर का ठेवता ? तुम्ही आम्हांला आपले म्हणून आपल्यांत सामावून का घेत नाही ? खेळीमेळीने का वागत नाही ? आपली भाषा का शिकवीत नाही ? मी पाहिले आहे की, आम्ही परदेशीयांनी तुमच्या कितीही जवळ येण्याचा प्रयत्न केला तरी तुम्ही मध्ये काही अंतर ठेवताच, आमच्याकडे अविश्वासाने पाहता. आफ्रिकन्स काळे म्हणून त्यांना तुच्छ लेखून दूर लोटता व युरोपियन्स, अमेरिकन्स गोरे म्हणून त्यांच्याकडे आदराने बघता; पण आम्हांला तुम्ही जवळ करीत नाही, असे का ?"

अधिवेशनाच्या काळात सावरकर सभागृहात परिषदेच्या कार्याची रूपरेषा देणाऱ्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यावरून नागालँड–मणीपूरपासून तो गुजरातपर्यंत आणि काश्मीरपासून केरळापर्यंत परिषद पोहोचल्याचे दिसत होते.

अधिवेशनात विद्यार्थ्यांनी दिलेल्या घोषणांवरून आणि त्यांच्या भाषणांवरून परिषदेने राष्ट्रीय एकात्मतेचे सूत्र बरोबर उचलले आहे हे जाणवत होते; पण भारतीय समाजातील वरिष्ठ-कनिष्ठ, ग्रामीण-शहरी ही उभी दुफळी सांधण्याच्या दृष्टीने परिषदेसमोर काय उपाययोजना आहे, याचा बोध परिषदेच्या कार्यक्रमांवरून होत नव्हता. परिषदेचे सदस्य प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गातील दिसत होते. ग्रामीण विद्यार्थ्यांचा अभाव जाणवत होता. खेड्याखेड्यांतून व दलितांच्या झोपड्यांतून परिषदेने मूळ धरले तर तिची ताकद चांगलीच वाढण्याचा संभव आहे.

अधिवेशनात भाषणे करताना प्रत्येक विद्यार्थी आपली परिषद ही पक्षीय राजकारणापासून कशी अलिप्त राहील, हे आवर्जून सांगत होता. परंतु सध्याचे एकूण राजकारणच इतके व्यापक बनले आहे की राजकारणाचे रंग परिषदेत मिसळू न देण्यात कार्यकर्ते कितपत यशस्वी होतील, हे काळच ठरवील. आजच परिषदेचे संघटनाबळ पाहून अनेक पक्ष तिच्या सहकार्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. कळत-नकळत का होईना पण पक्षीय राजकारणात जरी नाही तरी देशाच्या एकूण राजकारणातच परिषद ओढली जाण्याचा जबर संभव टाळण्यासाठी कार्यकर्त्यांना खूपच जागरूक राहावे लागेल. ●

# टोलफळ...

## □ लव्ह इन् दिल्ली!

" माणसाला किती जागा लागते ? " मेल्यानंतर पुरायचे असेल तर साडेतीन हात. दहन असेल तर काही नाही. परन्तु " प्रेमाला किती जागा लागते ? " हा प्रश्न सिनेमावाल्यांनी सोयीस्करपणे सोडवला आहे. " लव्ह इन् काश्मिर " असेल तर क्षेत्रफळ वाढते. " लव्ह इन् टोक्यो " असेल तर थोडे कमी होते. " लव्ह इन् जपान " ठरले असते तर हे लव्हाळे जपानभर फिरायला हरकत नव्हती. राज कपूरने 'संगम'मध्ये पॅरिस दाखवले. सध्या जॉय मुकर्जी-आशा पारेख यांचे " लव्ह इन टोकियो " चालू आहे. ही स्पर्धा अशीच वाढली तर " लव्ह इन् फ्रान्स-जर्मनी अ‍ॅन्ड रशिया ", " लव्ह इन् ईस्ट बर्लिन अ‍ॅन्ड वेस्ट बर्लिन ", " लव्ह इन् पाकिस्तान " असे एकाहून एक थोर चित्रपट भारतीय चित्रसृष्टीत निर्माण होतील. असल्या घेडगुजरी इंग्रजी शीर्षकांना सेन्सॉर बोर्ड आक्षेप का घेत नाही, असा प्रश्न तुम्ही विचाराल, तर ते चूक ठरेल. एखादी गोष्ट जेवढी जास्तीत जास्त घेडगुजरी तेवढी ती आपल्या सरकारला अतिशय आवडते. " ऑल इंडिया रेडिओ–मुंबई केन्द्र " हे आपण दिवसातून पंधरावीस वेळा ऐकतो की नाही ? " न्यू हनुमान हेअर कटिंग सलून " असा एका फटक्यात मारुतीचा नवा अवतार आपल्याला रस्त्यातच समजतो. 'रेशनिंग ऑफीसकडे ⟶ ' ही पाटी आपल्याला बुचकळ्यात टाकीत नाही ! मग " लव्ह इन् टोक्यो " याला सरकारने का बरे आक्षेप घ्यावा ! शिवाय टोकियो वगैरे सेन्सॉर बोर्डाला फुकट पाहायला मिळते ! घोटाळा इतकाच होतो की, पॅरिस-टोकियोसारख्या सुंदर शहरांतून तेथील रस्त्यांवर आपले लोकप्रिय नटनट्या जो धुडगूस घालतात, तो घालताना चकित झालेले परदेशी लोकही आपल्याला चित्रपटात दिसतात. यापेक्षा चित्रपट निर्मात्यांनी चित्रपटात प्रेमाचा स्वतंत्र भारतीय धुडगूस ठेवून, चित्रपटाच्या सुरुवातीला जगातल्या सुंदर सुंदर शहरांचा निराळा चित्रपट दाखवला तर काय होईल असा मोठा चाणाक्ष विचार प्रेक्षकांच्या मनात येईल. त्यांनी चित्रपट निर्मात्यांच्या व नटनट्यांच्या अडचणी ध्यानात घ्याव्या.

" पांढरी टोपी लाल रुमाल ", " बम्बईका बाबू ", " लव्ह इन् गोवा " असे एकाहून एक सरस चित्रपट भारतात निर्माण केले की निर्मात्याजवळ व नटनट्यांजवळ इतका पैसा जमतो की तो सांभाळणे हे एक काम होऊन बसते. या पैशालाच

काळा पैसा असे काही क्षुद्र जन म्हणतात ! हा पैसा उघडपणे खर्च करता येत नाही आणि सांभाळता ही येत नाही. एखादा सहस्रभोजने इन्स्पेक्टर कधी धाड घालील त्याचा नेम नसतो. मग या नटनटया नटीप्रेमी मंत्र्यांच्या शिडया लावून लंडन, पॅरिस, टोकियो इत्यादी शहरांतून चित्रपट निर्मितीसाठी परकीय चलन मिळवतात. निर्मात्यांना सरकार सढळ हाताने परकीय चलन देते. कमीत कमी लागणारा परकीय चलनाचा पुरवठा ताब्यात आला की मंडळी पॅरिस किंवा टोकियोत दाखल होतात. त्यांच्याजवळ काळा पैसा इतका असतो की परदेशांत भरमसाट दराने हवे तेवढे परकीय चलन विकत घेणे त्यांना परवडते. पंचवीस–तीस लाख रुपये नुसते पडून राहण्यापेक्षा त्यातले पाच-दहा लाख उपयोगी तर पडले......! हा व्यवहार काळया बाजारात चालतो. जवळचा बराचसा पैसा अशा रीतीने सत्कारणी लावून शिवाय गर्दी खेचणारा चित्रपट निर्माण करून मंडळी परत येतात ! आवश्यक तेवढया परकीय चलनाची 'खादी' सरकार पुरवते आणि या आधारावर ही 'देशसेवा' चित्रपट निर्माते करतात. या चित्रपटांतून 'टोकियो' व 'पॅरिस' ही शहरे कुरूप दिसतात या सबबीवर उद्या त्या त्या देशांनी चित्रपट निर्मितीला बंदी केली तरच ही देशसेवा थांबेल. नाहीतर "लव्ह इन् न्यूयॉर्क", "लव्ह इन् रोम", "लव्ह इन् लंडन" असे चित्रपट पुढल्या काही वर्षांत आपल्याला पाहता येतील. कारण, या चित्रपट सृष्टीतील मंडळींचे "लव्ह इन- दिल्ली" कधीही संपण्याची शक्यता नाही !

## □ केला इशारा जाता जाता

ही कपोलकल्पित कथा नाही. घडलेली गोष्ट आहे. मुंबईच्या उपनगरातील एका चाळीतील भाडेकरूंनी रात्री पहाऱ्याकरता एक गुरखा नेमला. चाळकऱ्यांच्या मासिक वर्गणीतून त्याचा पगार देण्याचे ठरले. गुरखा रात्री पहारा देऊ लागला. काही दिवसांनी गावालगत भटक्या जमातीचा मुक्काम पडला. गावात चोऱ्यांचे प्रमाण वाढले. गुरख्याने नवा सोटा, नवी पॉवरफुल् बॅटरी, खिळयांचे बूट, रिव्हॉल्व्हरचे लायसेन्स यांची तातडीने मागणी केली. भाडेकरूंनी हा सर्व नवीन खर्च अंगावर घेतला. गुरख्याच्या दिमतीला त्याचे आणखी चार जातभाई नेमले. "हुश्शार रहिये !" अशी घोषणा गुरख्यांनी द्यायला सुरुवात केली. गुरखे रात्री जागे आहेत, झोपत नाहीत, अशी लोकांची खात्री पटली ! परंतु चोर आल्याचे इशारे व गुरख्यांच्या पगारवाढीची मागणी दिवसेंदिवस वाढली. आता गुरखे रात्रीतून तीन–चार वेळा भाडेकरूंच्या दारावर रात्री–अपरात्री सोटा आपटून–'इशारे' देऊ लागले. एका भाडेकरूने शेवटी चाळकऱ्यांची सभा घेतली व विचारले–

"ही गुरखा पलटण आपण कशाकरता नेमली आहे ?"

" संरक्षणाकरता !" चाळकऱ्यांनी एका सुरात सांगितले.

" संरक्षण कशाकरता ?"

" रात्री स्वस्थ झोप लागावी व झोपलेले असताना चीजवस्तू जाऊ नये यासाठी !"

यावर सभा घेणाऱ्या चाळकऱ्याने विचारले, " मग ही गुरखा मंडळी रोज रात्री-अपरात्री आपल्यालाच कसले इशारे देतात? रिव्हॉल्व्हर दिला, सोटा दिला, बॅटरी दिली, खिळ्यांचे बूट दिले, गणवेष दिला तो काय आपल्याला इशारे देण्याकरता ?"

गुरख्याला चाळकऱ्यांनी सभेत बोलावले व तंबी दिली,

" आम्हांला रात्री इशारे देण्याकरता तुम्हांला नेमलेले नाही. इशारा चोरांना द्या ! चोरांपासून आमचे संरक्षण करायला तुम्हांला नेमले आहे की आमच्यापासून चोरांचे संरक्षण करायला ?"

चाळकऱ्यांनी तंबी देताच गुरख्यांनी रात्री–अपरात्रीचे इशारे बंद केले, परंतु भारतातल्या सामान्य जनतेने काय करावयाचे, हा प्रश्न आहे. रोज जनतेला इशारे मिळत असतात. सकाळी वृत्तपत्र उघडावे तो " पाक–चीन आक्रमणाबाबत संरक्षणमंत्र्यांचा इशारा !" नाहीतर " बिकट अन्नधान्यपरिस्थितीबद्दल अन्न–मंत्र्यांचा इशारा !" ठेवलेला असतो. जो तो जनतेला इशारे देत असतो. आता हे इशारे कुणी मनावर घेत नाही. कारण जनतेने काय करावे हे कुणीच सांगत नाही. " केला इशारा जाता जाता " हा आजच्या काँग्रेस सरकारने निर्माण केलेला सर्वांत लोकप्रिय खेळ आहे !!

## शब्दाचा अनर्थ

भारतात अंग-मेहनतीचे समाजकार्य करण्यासाठी आलेल्या ८० फ्रेंच स्वयंसेवकांपैकी एकाने केलेला लहानसा पण गंमतीदार खुलासा : विनाकारण मारलेल्या दांडीला इंग्लिशमध्ये 'फ्रेंच लीव्ह' म्हणतात – पण फ्रेंचमध्ये 'इंग्लिश लीव्ह' म्हणतात.

## □ कडक मुख्यमंत्री !

११ ऑगस्टला राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी जी निषेध-सुटी घेतली, त्याचा पगार सरकारने कापला. मुख्यमंत्री नाईक हे इतके कडक आहेत, की ज्या १६ आमदारांनी व मंत्र्यांनी, 'मुंबई बंद' झाली, म्हणून राजीनाम्यांचे नाटक तीन दिवस केले, त्यांचा तीन दिवसांचा पगारही मुख्यमंत्री कापणार आहेत, असे कळते ! ना. तल्यारखान व ना. शांतीलाल शहा यांना तीन दिवसांचा पगार व इतर १६ जणांना तीन दिवसांचे मानधन नाईक सरकार देणार नाही, याची जनतेने खात्री बाळगावी. 'ना. नाईक झिंदाबाद. शिस्तीचा विजय असो !'

## □ धोका

निवडणुका आल्या की पक्ष बदलण्याची लहर येते. पन्नास-हजार निदर्शकांनी, 'मुंबई बंद' पाडली आणि स. का. पाटलांनी एकाच रविवारी पन्नास हजार बौद्ध काँग्रेसमध्ये नेले ! काय हिशेब झाला ? जाऊ द्या ! पण पक्ष बदलणारांनी खालील धोका लक्षात ठेवावा—

> यः स्वपक्षं परित्यज्य परपक्षं निषेवते ।
> स स्वपक्षे क्षयं याते, पश्चात् तैरेव हन्यते ।।

जो कोणी आपला पक्ष सोडून विरुद्ध पक्षास जाऊन मिळतो, तो स्वपक्ष नाहीसा झाल्यावर, घरोबा केलेल्या नव्या पक्षांकडूनच मारला जातो.

—ग्यानबा



खास वार्तालेख

# उत्तर व्हिएटनाम ...दुर्दम्य प्रतिकार



उत्तर व्हिएटानामची राजधानी हनोई हे शहर अतिशय शांत आहे. सायकलस्वारांचे ताफेच्या ताफे शहरातील प्रमुख रस्त्यांवरून शांतपणे वाहतूक करीत असतात. शहरात खाजगी मोटारी कमीच, त्यामुळे अगदी गर्दीच्या वेळेलाही रस्ता कसा शांत वाटतो. रस्त्याच्या कडेला ओळीने लावलेल्या झाडांवरील पक्ष्यांची किलबिल सतत ऐकू येत असते. हिरव्या रंगाची लष्करी मोटार किंवा एखादा ट्रक मधूनच या शांततेचा काही काळ भंग करतो तेवढाच. कडेने ठिकठिकाणी बांधलेले छोटे छोटे खंदक जरी दृष्टीला पडले तरी जवळपास कुठे युद्ध चालू असेल याची पुसटही कल्पना येत नाही.

परंतु एकाएकी या शांततेचा भंग करीत अमेरिकन बाँबफेकी विमाने हनोईच्या आकाशात दृग्गोचर होतात. विमानहल्ल्याचे सूचक भोंगे वाजतात. क्षणार्धात रस्त्यावरील रहदारी थांबते. हनोईच्या सीमेवरील पेट्रोलच्या साठ्यांवर, पुलांवर, रस्त्यांवर अमेरिकन विमानांतून बाँब पडू लागतात. शहरात ठिकठिकाणी झाकून ठेवलेल्या रशियन विमानवेधी तोफा धडाड् धुम करीत आग ओकू लागतात. सुमारे तास अर्धा तास ही धुमश्चक्री चालते. मग विमाने परततात. काही मार खाऊन, काही मार देऊन. ' सबठीक 'चे भोंगे वाजतात आणि पुन्हा रहदारी पूर्वीइतक्याच शांतपणे सुरू होते. जणू काही घडलेच नाही, अशा थाटात.

## युद्ध हाच स्थायीभाव

युद्धाची आता व्हिएटनामी लोकांना पूर्ण सवय झाली आहे. विध्वंसक बाँबहल्ले, मशीनगन्सचा गोळीबार, फटाफट पडत असलेले मुडदे, रक्त, मांस, हे व्हिएटनामी



हनोईतील हमरस्ता... युद्धाची पुसटही कल्पना नसलेला...

लोकांना—उत्तर व दक्षिण दोघांनाही—आता नित्याचे झाले आहे. दोन सप्टेंबर १९४५ रोजी संपूर्ण व्हिएटनाम प्रथम स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले. पण तेव्हापासून व्हिएटनामी लोकांना मेसूर युद्धाला तोंड द्यावे लागत आहे. युद्ध हा त्यांचा स्थायी-भाव झाला आहे. इतका की, युद्धाच्या भीषणतेशिवाय जीवन असू शकते याची व्हिएट-नामच्या नव्या पिढीला जाणीवही नसेल. आपल्या स्वातंत्र्यासाठी, सार्वभौमत्वासाठी आणि एकतेसाठी सारी व्हिएटनामी जनता जवळ जवळ आत्मबलिदान करायला तयार झाली आहे. स्वातंत्र्यासाठी आणि एकतेसाठी जगातल्या कुठल्याच देशाने एवढचा विचित्र युद्धाला तोंड दिले नसेल आणि अशी किंमत दिली नसेल.

अमेरिकेच्या अतिबलाढ्य हवाईदलाच्या विध्वंसक बाँबहल्ल्यांना गेले दीड वर्ष सहनशीलतेने तोंड देत उत्तर व्हिएटनाम टिकून राहिले तरी कसे, याचे अमेरिकन लष्करी तज्ज्ञांनाही आश्चर्य वाटते. दक्षिण व्हिएटनाममधील गनिमी युद्धाला पायबंद घालण्यासाठी अमेरिकेने फेब्रुवारी १९६५ पासून उत्तर व्हिएटनामवरील हवाई हल्ल्यांना प्रारंभ केला. प्रथम दूरदूरच्या लष्करी तळांवर हल्ले करून आता अमेरिकन हवाई दलाने हनोई आणि इतर प्रमुख शहरांच्या भोवतालची दळण-वळणाची साधने, पूल, रस्ते, पेट्रोल साठे, वीजपुरवठा गृहे यांचा नाश करण्याचे सत्र आरंभिले आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीवरील हवाई हल्ल्यांच्या ऐन धुम-श्चक्रीत साऱ्या जर्मनीवर रोज जेवढे बाँब पडत होते, त्यापेक्षा अधिक बाँब अधिक अचूक रीतीने, अधिक कुशल अमेरिकन वैमानिकांकडून रोज आता उत्तर व्हिएटनाम-वर टाकले जात आहेत. आणि तरीही उत्तर व्हिएटनाम टिकून आहे.

"शेवटी आम्हीच हे युद्ध जिंकणार" उत्तर व्हिएटनामचे अध्यक्ष हो-ची-मिन्ह आत्मविश्वासाने म्हणतात–"अमेरिकन जनता फार काळ लांबत चाललेल्या गनिमी युद्धाला नक्कीच कंटाळेल आणि अंतिम विजय आमचाच होईल."

## व्हिएटनामी जनतेची दोन दैवते

व्हिएटनामी जनतेमध्ये एवढा दुर्दम्य आत्मविश्वास आणि सहनशीलता टिकवून धरणारी व्हिएटनामची स्फूर्तिस्थाने आहेत, हो-ची-मिन्ह आणि उत्तर व्हिएटनामचे संरक्षणमंत्री जनरल व्हो न्गुयेन झॉप. ७६ वर्षांचा, लहानशी दाढी राखणारा, पायात मोटारच्या टायरपासून केलेल्या वहाणा आणि अंगात साधे कपडे घालणारा ठेंगण्या बांध्याचा आणि प्रेमळ चेहऱ्याचा हो ही व्हिएटनाममधील अत्यंत प्रिय व्यक्ती आहे. हनोईजवळील एका झोपडीवजा बंगलीत तो राहतो. तो ब्रह्मचारी आहे, आणि देशाच्या उच्चपदी आरूढ झाल्यानंतर त्याने आपल्या साऱ्या नातेवाईकांशी संबंध तोडून टाकले आहेत. आपल्याला भेटायला आलेल्या राजकीय पाहुण्यांवर विनोद करून त्यांची भंबेरी उडविण्यात त्याला फार मौज वाटते. त्याला व्यसन एकच, ते म्हणजे उंची अमेरिकन सिगारेट्स् ओढण्याचे. कोठल्याही वेळी बघा, त्याचे सतत धूम्रपान चालू असते. देशातील उत्तम विद्यार्थ्यांना "हो-ची-मिन्हचे नातू" म्हणून किताब देण्यात येतो आणि मुले हा किताब आनंदात मिरवतात. होचे रेडियोवर भाषण असले म्हणजे रस्त्या-रस्त्यांवर रेडिओ सेट्स्‌भोवती ते ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी जमते.

व्हिएटनामी सैनिकांचे दैवत आणि हो-ची-मिन्हचा उजवा हात जनरल व्हो न्गुयेन झॉप याने कोठल्याही लष्करी शाळेत औपचारिकरीत्या लष्करी शिक्षण घेतलेले नाही. व्हिएटमिन्ह गनिमी सैनिकांचे आणि फ्रेंचांचे गेल्या दशकात उत्तर व्हिएटनाममध्ये जोराचे युद्ध चालू असता जनरल झॉपने दियेन बियेन फू येथील १२ हजार सुसज्ज फ्रेंच सैनिकांना कोंडीत गाठून त्यांचा धुव्वा उडवला. या दियेन बियेन फू येथील पराभवानेच फ्रेंचांचे कंबरडे मोडून त्यांनी व्हिएटनाममधून काढता पाय घेतला. तोपर्यंत जनरल झॉपचे नावही कुणाला माहीत नव्हते.

दियेन बियेन फूला शरणागती पत्करताना फ्रेंच जनरल डी कास्ट्रीज याने कुतूहलाने जनरल झॉपला विचारले, "कोणत्या मिलिटरी ॲकॅडेमीत तुमचं शिक्षण झालंय ?" जनरल झॉप उत्तरला, "हनोईच्या फ्रेंच युनिव्हर्सिटीतील कायद्याच्या शाळेत."

५६ वर्षांचा जनरल झॉप मूळचा शिक्षक. फ्रेंच युनिव्हर्सिटीत कायद्याचा अभ्यास करीत असतानाच त्याने फ्रेंच राज्यक्रांतीचा आणि नेपोलियनच्या युद्धतंत्रांचाही जवळून अभ्यास केला. तो एक उत्कृष्ट वकील होऊ शकला असता. पण त्या वेळच्या व्हिएटनामी स्वातंत्र्य चळवळीत उडी टाकून त्याने लोकसेवेचे व्रत अंगीकारले व

शिक्षकी पेशा पत्करला. शेतकऱ्यांशी त्याने घनिष्ट संबंध जोडले. आणि व्हिएट-मिन्ह संघटनेमध्ये भरती झाल्यावरच त्याने प्रथम बंदूक हाती धरली. पण थोड्याच काळात आपल्या नैसर्गिक प्रतिभेच्या जोरावर त्याने गनिमी युद्धतंत्र आत्मसात केले. आज तो एक उत्कृष्ट सेनापती आणि माओ-त्से-तुंगच्या बरोबरीचा गनिमी युद्धतज्ज्ञ मानला जातो. आपल्या गनिमी काव्याने दक्षिणेत अमेरिकनांना बेजार करणारे, फाळणीपूर्वी व्हिएटमिन्ह म्हणून व आता व्हिएटकाँग म्हणून ओळखले जाणारे काटक गनिमी सैनिक जनरल ग्रॉपच्या हाताखाली तयार झालेले आहेत.

## दियेन बियेन फू

अमेरिकेचे लष्कर एवढे आधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असताना उत्तर व्हिएट-नाम आणि दक्षिणेतील व्हिएटकाँग कशाच्या बळावर अशी टक्कर देत आहेत ? त्यांना थोड्याफार प्रमाणांत रशियन आणि चिनी शस्त्रास्त्रांचा पुरवठा मिळत असला तरी त्यांची सारी मदार आहे 'दियेन बियेन फू' वर. दियेन फू हे पाश्चात्यां-वरील व्हिएटनामी विजयाचे प्रतीक मानले जाते. व्हिएटनामी लोकांची श्रद्धा आहे, की अमेरिकनांनाही कुठेतरी आणि कधी तरी दियेन बियेन फू सापडेलच.

दुसऱ्या महायुद्धानंतर इंडोचायनामधून जपानने काढता पाय घेतल्यानंतर प्रथमच संपूर्ण व्हिएटनाम स्वतंत्र झाला. २ सप्टेंबर १९४५ रोजी हो-ची-मिन्हने व्हिएट-नामी स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यानंतर बऱ्याच गोष्टी घडल्या, व्हिएटनामची फाळणी झाली. पण अजूनही उत्तर व्हिएटनाममध्ये २ सप्टेंबर हाच संपूर्ण व्हिएट-नामचा स्वातंत्र्य-दिन म्हणून पाळण्यात येतो.

परवा अशाच स्वातंत्र्य-दिनाच्या मेळाव्यात भाषण करताना उत्तर व्हिएटनामचे पंतप्रधान श्री. फॉम व्हॅन डाँग म्हणाले, " फ्रेंचांप्रमाणे अमेरिकनांनाही दियेन वियेन फू चा धडा शिकायचा असेल तर तो त्यांना शिकविण्याची आमची तयारी आहे. "

उत्तर व्हिएटनामवर अमेरिकेने हवाई हल्ल्यांना सुरुवात करून आता दीड वर्ष होऊन गेले. हवाई हल्ल्याला सुरुवात करताच उत्तर व्हिएटनामची सारी अर्थव्यवस्था कोलमडून पडेल, असा जो अमेरिकनांचा अंदाज होता तो साफ फसला. इतकेच नव्हे तर या हवाई हल्ल्यांना ते राष्ट्र पुरून उरले आहे. दुसरे कोणतेही कमकुवत राष्ट्र असते तर ते या बाँबहल्ल्यांनी जेरीला येऊन महिनाभरात कोलमडून पडले असते. पण उत्तर व्हिएटनाम अजून टिकून आहे. एवढेच नव्हे तर अमेरिकेला आव्हान देत आहे. त्याला रशिया आणि चीनचा थोडाफार पाठिंबा असला तरी बाँबहल्ल्यापासून होणारी वित्तहानी व प्राणहानी भरून काढण्यासाठी जी मूलभूत, आर्थिक व मानसिक ताकद लागते तरी उत्तर व्हिएटनाममध्ये भरपूर प्रमाणात आहे.

## गनिमी तंत्र

अमेरिकेच्या बाँबहल्ल्यांपासून दळवळणाच्या साधनांची हानी होत असली तरी उत्तर व्हिएटनामने आपल्या व्यवहारांचा गाडा सुरूच ठेवला आहे. अमेरिकन विमानांनी पूल उद्ध्वस्त केले की रातोरात नदीच्या प्रवाहाखालून जाणाऱ्या तरापयांचे पूल बांधून रहदारी सुरू होते. मोठमोठे मालवाहू ट्रक्स अमेरिकन वैमानिकांचे आवडते लक्ष्य. तेव्हा धान्याची पोती किंवा इतर असेच महत्त्वाचे सामान ट्रक्समधून वाहून न नेता दोन-दोन तीन-तीन सायकलींचा मिळून कौशल्याने एक ट्रक करून ते वाहून नेले जाते.

अमेरिकेने पेट्रोल साठ्यांवर हल्ले करावयास सुरुवात केल्यापासून पेट्रोलचे साठे शहरांपासून भराभर दूर नेऊन वेगवेगळ्या ठिकाणी खेड्यापाड्यांमधून विखरून ठेवण्यात आले आहेत. उत्तर व्हिएटनाममधील बरीच वीज नद्यांच्या धरणांपासून मिळविली आहे. फार मोठी प्राणहानी होईल म्हणून अमेरिकेने अद्याप धरणांवर बाँबहल्ले केले नाहीत. त्यामुळे अजून उत्तर व्हिएटनाममध्ये वीजपुरवठा सुरळीत चालू आहे. कापडाचे आणि धान्याचे शिस्तबद्ध रेशनिंग उत्तर व्हिएट-नाममध्ये आहे.

गेल्या दीड वर्षांत आपली सुमारे ५०० बाँबफेकी विमाने आणि सुमारे १५० हेलीकॉप्टर्स उत्तर व्हिएटनामवरील हल्ल्यात बळी पडल्याचे खुद्द अमेरिकेनेच कबूल केले आहे. हनोई सरकार आपण याच्या तिपटीने अमेरिकन विमाने पाडल्याचे सांगते. रशियाने दिलेल्या विमानवेधी तोफा आणि सबमिसाईल्स वापरून उत्तर व्हिएटनामी लष्कराने हल्लेखोर अमेरिकन वैमानिकांचे काम कठीण करून ठेवले आहे.

व्हिएटनामी सैनिक अगोदरच कडवे लढवय्ये म्हणून ओळखले जातात. त्यांना फ्रेंचांशी आणि अमेरिकनांशी लढण्याचा आता अनुभव मिळाला आहे. कधी काळी युद्ध थांबले आणि संपूर्ण व्हिएटनाम एक होऊन व्हिएटनामी लष्कराला आधुनिक शस्त्रास्त्रांची जोड मिळाली तर आग्नेय आशियातील ते एक अत्यंत प्रबळ राष्ट्र ठरेल यात शंका नाही.

पण युद्ध लवकर थांबणे शक्य नाही. कळत नकळत का होईना अमेरिका व्हिएट-नाममध्ये इतके गुंतली आहे, की विजय पदरात पाडून घेतल्याशिवाय अमेरिकेने व्हिएटनाममधून माघार घेतली तर अमेरिकनांचे नाकच खाली होईल. त्यामुळे नावापुरता तरी आपला हेतू साध्य झाल्याशिवाय अमेरिका व्हिएटनाममधून माघार घेणार नाही. अमेरिकेचे हेतू दोन. कम्युनिस्टविरोधी किंवा कमीत कमी अलिप्त राजवट दक्षिण व्हिएटनाममध्ये कायम ठेवणे आणि दुसरा अधिक व्यापक हेतू म्हणजे आशियातील चिनी कम्युनिझमच्या प्रसाराला पायबंद घालण्यासाठी आशियात आपले तळ उभारणे.

इकडे दक्षिण व्हिएटनाममधील व्हिएटकाँग व उत्तर व्हिएटनामही संपूर्ण व्हिएटनाम एक करण्यासाठी ईर्ष्येला पेटले आहेत.

**कंटाळवाणे युद्ध**

अमेरिकन हल्ल्यांना तोंड देण्यासाठी अनिच्छेने कां होईना उत्तर व्हिएटनाम अधिकाधिक कम्युनिस्ट गोटात आणि चीनजवळ असल्याने चीनकडे ढकलले जात आहे. चीन कधी प्रत्यक्ष युद्धात पडते याची संधीच अमेरिका पाहत आहे. चीन एकदा युद्धात पडले की मुख्य चिनी भूमीवर हल्ला करायला अमेरिकेला कारण सापडेल. तसे झाले तर तिसरे महायुद्ध कधी उसळेल याचा नेम नाही.

दरम्यान सुमारे साडेतीन कोटी व्हिएटनामी जनता एका भयानक युद्धाला तोंड देते आहे. युद्ध कधी संपेल याची शाश्वती नाही. विजयाची कोणत्याच बाजूला खात्री नाही, तरीही हे कंटाळवाणे युद्ध घुमसतच आहे. ●

## नवे अस्त्र !

आजपर्यंत अमेरिकेने उत्तर व्हिएटनाममध्ये नपालम बाँबपासून तो, एकदा टाकल्यानंतर कैक दिवसांनी स्फोट होणाऱ्या बाँबपर्यंत नाना तऱ्हेची चित्रविचित्र शस्त्रास्त्रे वापरली आहेत. पण आता अमेरिकेने आपल्या प्रचंड शस्त्रागारातील एक विनोदी अस्त्र व्हिएटनाममध्ये वापरण्यासाठी बाहेर काढले आहे. हे अस्त्र म्हणजे ढेकूण.

अमेरिकन संरक्षण तज्ज्ञांनी ढेकणांचा एक अभिनव उपयोग करून घेण्याचे ठरविले आहे. गनिमी व्हिएटकाँग जवळपास कुठे फिरकले तर त्यांचा या ढेकणांना वास येऊन ते विशिष्ट तऱ्हेची कर्कश शीळ घालून अमेरिकन सैनिकांना सावध करू शकतील. त्यानुसार अमेरिकन ढेकणांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम सध्या अमेरिकन सरकारने जोरात हाती घेतला आहे.

## विचारवारे

— समीर

# ☐ गोंधळलेल्या जगातला गोंधळलेला नाटककार

न्यूयॉर्कच्या फिनिक्स नाटयसंस्थेचे संस्थापक नॉरिस हाउटन यांच्या मते आजच्या अमेरिकन नाटयसृष्टीतली सर्वांत मोठी उणीव म्हणजे पहिल्या दर्जाच्या नाटककारांचा अभाव. गेल्या आठवडयात नव्या दिल्लीत नॅशनल स्कूल ऑफ् ड्रामामध्ये बोलताना ते म्हणाले, "टेनेसी विल्यम्स, आर्थर मिलर आणि विल्यम इंज ही सुप्रसिद्ध त्रयी आता संपली नसली तर निदान थबकली तरी आहे. या तिघांची सर्वोत्कृष्ट नाटके दहा किंवा पंधरा वर्षांपूर्वी लिहिली गेली. आता एडवर्ड आल्बीसारखे उदयोन्मुख नाटककार त्यांची जागा घेतात काय हे पाहायचे."

जगात हल्ली चांगल्या नाटककारांचा तुटवडा का भासावा ? आजचे जग फार गुंतगुंतीचे झाले आहे व आजच्या युगात फार मोठा मानसिक गोंधळ माजला आहे, हे बहुधा याचे कारण असावे. आपल्याला काय सांगायचे आहे, हेच नाटककारांना कळत नसावे व ते कळत असल्यास कसे सांगावे हे कळत नसावे. जगात जरी थोडा अधिक समतोलपणा आला तर नाटककारांना आपले विचार शब्दांत मांडता येतील. पण सध्याच्या जगात निदान नाटककाराला हवे तसे नाटय किंवा संघर्ष नाही.

नाटयकलेने स्वतःच्या जिवावर जगले पाहिजे, असा आतापर्यंत आग्रह होता. त्यामुळे अमेरिकेत नाटयकलेच्या आर्थिक बाजूवर विशेष भर दिला जात असे. पण आता उशीरा का होईना, नाटक ही एक कला असल्याची जाणीव होऊ लागल्याने पैशावरचा हा भर कमी होऊ लागला आहे. अमेरिकन सरकारने सुमारे वर्षापूर्वी एक राष्ट्रीय प्रतिष्ठान स्थापून सर्व कलावंतांना मदत करण्याची सोय केली आहे.

अमेरिकन नाटयसृष्टीतली दुसरी चांगली घटना म्हणजे पूर्वी दोन चार ठिकाणीच सक्रीय नाटयसंस्था होत्या, तर आता त्या सर्वत्र पसरल्या आहेत. गेल्या दहा वर्षांत सबंध अमेरिकेत ४६ नाटयसंस्था स्थापन झाल्या आहेत. त्यामुळे आता अमेरिकेची स्वतःची अशी एक विशेष नाटयशैली निर्माण होण्याची शक्यता दिसू लागली आहे. रशियात अशी स्वतंत्र शैली विकसित झाली आहे. पण देशातल्या सर्व नाटयप्रेमी व कलावंतांनी एकाच दिशेने व एकाच उदिष्टासाठी प्रयत्न केला तर राष्ट्रीय नाटयशैली निर्माण होऊ शकते.

सध्या अमेरिकेत कुशल नट बरेच आहेत व त्यांना अभिनयकलेचे शिक्षणही मागील पिढीपेक्षा बरेच चांगले मिळाले आहे. त्यामुळे आता त्यांची इतकी तयारी

झाली आहे, की ते एका रात्री इब्सेन, दुसऱ्या रात्री बेकेट, तिसऱ्या रात्री शेक्सपियर तर चौथ्या रात्री शेरिडनचे प्रयोग करू शकतात. चांगले दिग्दर्शकही आहेत. पण त्यांचे ठराविक वर्ग पडण्याची अनिष्ट प्रथा वाढत्या प्रमाणात दिसत आहे. प्रत्येक दिग्दर्शक एखाद्या विशिष्ट प्रकारच्या नाट्यप्रसंगासाठी विशेष ओळखला जाऊ लागला आहे. अर्थात् हे इष्ट नाही; कारण त्यामुळे त्यांच्या दिग्दर्शन कौशल्याला पुरेसा वाव मिळत नाही.

## □ अखंड जर्मनी

द्विखंड भारतात अखंड भारताच्या गोष्टी करणे पाप समजले जाते. पण त्रिखंड जर्मनीत अखंड जर्मनीचा प्रचार गेली बारा वर्षे पद्धतशीरपणे चालू आहे. १९५४ साली पश्चिम जर्मनीत स्थापन झालेल्या ' अखंड जर्मनी ' या नावाच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. स्कुएझ नुकतेच भारतभेटीसाठी आले होते. तेव्हा त्यांनी " अखंड जर्मनीशिवाय युरोपला तरणोपाय नाही " हे सत्य निःसंदिग्ध शब्दांत सांगितले. त्यांच्या मते आता एकामागून एक जागतिक समस्या सोडविण्यासाठी कंबर कसण्याची वेळ येऊन ठेपली आहे. व्हिएटनाममधले युद्ध जर थांबले तर इतर ' पेटते ' प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करता येईल आणि जर्मनीची समस्या या प्रश्नांपैकीच एक आहे.

अखंड जर्मनीमुळे जागतिक शांततेला धोका निर्माण होईल, अशी भीती प्रदर्शित केली जाते. पण जर्मनी विभक्त राहण्यातच युरोपच्या सुरक्षिततेला व जागतिक शांततेला धोका आहे. पूर्व जर्मनीतल्या दडपशाहीमुळे कुठल्याही क्षणी परिस्थितीचा स्फोट होऊ शकेल.

जर्मनीच्या पुनरेकीकरणावर युरोपातली स्थायी शांतता अवलंबून आहे यात शंका नाही. परंतु हे उमजण्यासाठी विभक्त जर्मनीतल्या सत्य परिस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही. सत्य परिस्थिती अशी आहे, की सर्व जर्मन जनतेला अखंड जर्मनी हवा आहे व विभाजनामुळे सर्वांचेच हाल होत आहेत; जर्मन समस्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचाच एक भाग आहे; तेव्हा तिच्याशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या वड्या राष्ट्रांना एकत्र बसून जर्मनीच्या एकीकरणाचा शांतातामय मार्ग शोधून काढावा लागेल.

' अखंड जर्मनी ' ही संस्था जर्मनीच्या दोन भागांत काहीतरी ' संभापण ' व्हावे म्हणून नेत्यांची देवाण-घेवाण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन कार्यक्रम यांचीही अनिर्बंध देवाण-घेवाण उपयुक्त ठरेल. पण त्यासाठी वड्या राष्ट्रांनी ' दुसऱ्या भागा 'वर नैतिक दडपण आणले पाहिजे. हिंदुस्थान हे दडपण आणील काय ?

● ● ●

# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## निवडक निरूपणे



## १ : नाम पूर्वी होते, आज आहे व पुढेही राहील

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे. त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड व दृश्य असल्याने उत्पत्ती, स्थिती व विनाश, वाढ होणे व घटणे, जागा व्यापणे व जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादी बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे व सूक्ष्म असल्याने त्याला उत्पत्ती व विनाश, वाढ व घट, देशकाल निमित्ताच्या मर्यादा इत्यादी कोणतेही विकार नाहीत. म्हणून नाम हे पूर्वी होते, आज आहे आणि पुढेही तसेच राहील.

नाम हे सत् स्वरूप आहे. जगातील रूपांचे प्रकार, हे नुसत्या रोजच्या व्यवहारात लागणाऱ्या वस्तूंकडे पाहिले तरी कळून येतील. दगड, लाकूड, आंबा, पाणी, भात, झाड, घड्याळ या प्रत्येक वस्तूच्या समुच्चयासाठी एकेक नाम असते. उदाहरणार्थ, अनेक तऱ्हेच्या दगडांना 'दगड' हे नाम आहे. अनेक प्रकारचे आंबे 'आंबा' ह्या नामातच येतात. अशा रीतीने या जड जगामध्ये जशी अनेक रूपांची गर्दी आहे, तशी सूक्ष्म जगामध्ये अनेक नामांची गर्दी आहे का? त्याचे उत्तर देण्याआधी आपण आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू.

समजा, आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात ते पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाशकिरणे आत मेंदूपर्यंत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्यास ज्ञान होण्यास इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तुस्वरूप देते. वस्तुस्वरूप तयार झाल्यावर बुद्धी सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार येथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहत असता झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इत्यादी सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा "ही सृष्टीची शोभा आहे," असे

ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे, हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे.

या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते, नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नामे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांच्यामध्ये 'असणेपणा'चा गुण आहे, म्हणजे सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे,' आणि निर्जीव वस्तू झाली तरी तो 'आहे.' एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच ओंकार असेही म्हणतात. ओंकारातून सर्व सृष्टी उगम पावली. ओंकार हे परमात्म्याचे स्वरूप आहे, म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात व त्यांमध्येच ती लीन पावतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक राहतेच. या संसारामध्ये नाम, आणि रूप, अव्यक्त आणि व्यक्त, सूक्ष्म आणि जड हे जोडीने काम करतात. त्यांमध्येदेखील जड किंवा रूप हे सूक्ष्मातून किंवा नामातून आकाराला येते, नामाच्या सत्तेनेच जगते आणि शेवटी नामातच अंतर्धान पावते. नाम हे नुसते सत् नाही. ते सत् म्हणजे नेहमी असणारे म्हणजे कधी न नसणारे म्हणजे ज्यामध्ये कधीही फरक न होणारे असे आहे. त्यामुळेच ते शांत आहे, समाधानरूप आहे. म्हणूनच ते पूर्ण आहे. ते पूर्ण आहे म्हणूनच दुःखाचा लवलेश नाही, यासाठी ते आनंदरूप आहे. आनंद हा केव्हाही जड असू शकत नाही म्हणून नाम चिन्मय आहे.

## २ : मायेच्या तावडीतून सुटण्यास नाम हेच साधन

पुष्कळ लोकांना परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे मनातून फार वाटते. पण काही ना काही कारणांनी ते घडत नाही. असे का व्हावे? तर माया आड येते. मग मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोचायचे ? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे. तिला सोडून तू ये, असे सांगणे म्हणजे भगवंतालाच तू येऊ नकोस, असे म्हणण्यासारखे आहे.

समजा, एखाद्या इसमास एका मोठ्या व्यक्तीस भेटावयाचे आहे, पण त्याच्याकडे सरळ जाणे शक्य नाही; कारण, त्याच्या घराच्या दारावर रखवालदार, कुत्री वगैरे आहेत. तेव्हा त्यांच्या तावडीतून सुटून गेले तरच मालकाची भेट होणार. पण समजा, "मला अमक्या दिवशी येऊन भेटावे," अशा मजकुराचे त्या मालकाच्या सहीचे पत्र जर आपल्याला आले असेल तर ते पत्र त्या रखवालदारास दाखविताच तो आपल्याला बिनतक्रार आत सोडील व मालकाची भेट होईल; तसे भगवंताचे नाम म्हणजे सहीचे पत्र जर आपण घेऊन गेलो तर मायारूपी रखवालदार ती सही पाहून आपल्याला आत सोडील व भगवंताची भेट होईल.

●

# अमृतस्य पुत्राः वयम्

आम्हि पुत्र अमृताचे आम्हि पुत्र या धरेचे
उजळून आज दावू भवितव्य मातृभूचे धृ.
पृथ्वीस जिंकणारे झाले अनेक येथे
नाही निशाण त्यांचे उरले जगात कोठे
गेली सहस्र वर्षे लढलो न थांबताही
गझनी सिकंदराची उरली न मृत्तिकाही
आम्ही काल-पुत्र आम्हां येईल मरण कैचे

जगतात येउनी जे गेले अनेक देश
क्षणमात्र 'रोम' ऐसा दिपवीतसे जगास
नाही तयांस जगती अमरत्व प्राप्त झाले
ते ज्ञान, ती कला, ते सर्वस्व नष्ट झाले
आम्हीच पाहिलेले हे आदि अन्त त्यांचे

जरी कालकूट प्यालो तरी नाही मृत्यू आम्हा
अग्नीत पद्मिनीचा जळतो कधी न आत्मा
दाहीर कन्यकांचे जरी देह आज नुरले
आत्मे तरी तयांचे अति दिव्यरूप ल्याले
ते प्राण आमुचे अन् आम्ही प्राण या जगाचे

हे राष्ट्र संकटांशी लढले अनेक वेळा
कोणी न जिंकिले हे भासे अजेय काळा
या राष्ट्र-जीवनाचा हा वृक्ष अमर ज्याला
जरि तोडिले बळाने तरि स्पर्शितो नभाला
त्याचेच पुत्र आम्ही जयवंत जे सदाचे

ही चिन्मयी भरतभू जगतास ज्ञान देता
जी देव-जन्म-भूमी धर्मांस ग्लानि येता
ही मूर्त अन्नपूर्णा-जगतास पाळताना
जी कालि-रूप घेते शत्रूस मारताना
या माउलीस अर्पू गुरु-स्थानचि जगाचे

*—बाळ कोठे*

# माहेर

किती समजावू माझ्या
मूढ अवखळ मना
आले नुकती सासरी
सुरू माहेराच्या वेणा ॥

जाय हातातले बळ
काही पडते सांडते
उसळती आठवण
उरी थैमान घालते ॥

स्मृती खटचाळ आणीते
सर्व आषाढीची झड.
बांध अभंग मनाचा
जाई फोडून पल्याड ॥

*—सौ. इंदिरा कुलकर्णी*

# मागोवा

आता घेताना मागोवा
जुनी वाट झाकळावी
दूर धुक्यातून कोणी
जुनी कथा रेखाटावी

आज व्हावे डोळाबंद
रंगरूप पळसाचे
जागवावे भाव मनी
भोळ्या खुळ्या शेवरीचे

अर्ध खुल्या पापणीत
स्वप्न सारे साठवावे
कणक्षण सोशिलेले
दिठीदिठीत मिटावे

*—सौ. उज्ज्वला केळकर*

## व्यथा

मोतियाच्या ताटी
काव्याची कोरांटी
अश्लीलता कोलांटी
—मारीतसे
प्रतिभेची भरारी
कल्पनांची उधारी
कवी मात्र भिकारी
—राहातसे
नेणिवेची भूक
वांझोटीला सुख
वेदना आपसुक
—व्याकुळते

—*जयवन्त गुजर*

# आस्वाद

"माहेर" ही कविता थेट अंतःकरणापर्यन्त जाते. सौ. इंदिरा कुलकर्णी यांनी स्त्रीचे माहेराकडे ओढ घेणारे मन नीटस शब्दांत रंगवले आहे. कविवर्य तांब्यांच्या 'नववधू'ची ही दुसरी बाजू म्हणता येईल. शेवटच्या कडव्यात 'खटचाळ' स्मृती कोणती हे मात्र नीटसे लक्षात येत नाही. असे वाटते की, अशी स्मृती माहेरापेक्षा सासरविषयीच निर्माण होणे अधिक शक्य. साऱ्या कवितेत मनाला थोडा खटकतो हा 'खटचाळ' शब्द. पण बाकी एक सुंदर स्त्री-गीत म्हणून ही कविता वाखाणण्यास हरकत नाही. "व्यथा" ही जयवंत गुजर यांची कविता काहीशी विरोधाभासाने नटलेली आहे. कवीची प्रतिभा संपन्न असली तरी कवीला दारिद्र्याचे व्रत अंगीकारावे लागावे हा अनुभव पुरातन आहे. शेवटच्या कडव्यात नेमके काय सांगावयाचे आहे ते स्पष्ट होत नाही. या कडव्याची भाषा गूढ आणि थोडी नादमधुर आहे. मनाला जे काही पटेल त्याचा आकार मात्र स्पष्ट होत नाही.

बाळ कोठे यांचे "अमृतस्य पुत्रः वयं" हे गीत आणीबाणीच्या परिस्थितीत निर्माण झाले की काय हे कळत नाही ! अर्थात कविता तात्कालिक कारणाने स्फुरली तरी काव्यात काही तरी कायमचे सौंदर्य सापडले पाहिजे. या कवितेत जुन्या प्रसिद्ध उर्दू गीतांपासून गाजत असलेल्या काही समर गीतांपर्यन्तच्या अनेक गीतांतले ध्वनी प्रतिध्वनी ऐकू येतात. आनंदकंद या वृत्ताशी दोन-तीन ठिकाणी कवीने झटापट केली आहे. रेव्हरंड टिळकांची मातृभूमीस गुरु-स्थान अर्पिण्याची कल्पना शेवटच्या ओळीत कवीने वापरली आहे. मात्र काही स्फूर्तिदायक उल्लेख आणि ओघवती रचना यांमुळे कवितेचे रूप मनात भरते.

आजच्या काव्यगुच्छात विशेष टपोरे फूल "मागोवा" हे आहे. आकार लहान असला तरी गुणवत्ता मोठी आहे. सिंहावलोकन हे नेहमीच तापदायक होते. विशेषतः, भूतकाळात आठवण्यासारखे काही असेल तर मन अधिक विव्हळ होते. जे अनुभवले होते ते स्वप्नासारखे साठवावे लागते. ही एक मानवी जीवनातील शोकांतिका आहे. पळसाचे डोळाबंद रूप आणि मोळीखुळी शेवरी मन वेधून घेते ह्या प्रतिमा कवयित्रीने ज्या आशयासाठी वापरल्या त्यांहून रसिकाला कदाचित वेगळाच आशय वाटू शकेल.

—**गोपीनाथ तळवलकर**

म्हटलं, "बाई, नीट वागशील तर माझ्यासारखा दादला नाही, आणि खराब वागलीस तर माझ्याएवढा खतरनाक कोणी नाही." मुकाट्याने तिने मान हलवली अन्—

# ओक बाईल ओक दादला

दिलीप पत्की

'कामाक्षी'च्या 'स्पेशल रूम'मध्ये मी एकटाच बसलो होतो. आज जणू काय, माझ्या मनातली अस्वस्थता ओळखून सर्व गिऱ्हाइकांनी हॉटेलवर बहिष्कार टाकला होता. चहा देऊन वेटरही अर्ध्या घंट्यापूर्वी जो गेला होता तो अजून उगवला नव्हता. सिगारेटचा धूर सोडत मी एकटाच बसलो होतो. मनाशी खंत करीत होतो.

एकाएकी दरवाजाचा आवाज झाला. दचकून मी दरवाजाकडे पाहिले. या अशा अवेळी कोण आले असावे, याचे मला कुतूहल वाटले. आतमध्ये येणाऱ्या व्यक्तीचे मी निरीक्षण केले.

जवळपासच्या खेड्यांतून बाजारासाठी म्हणून येणाऱ्या एखाद्या खेडवळासारखा तो होता. तरुणपणी तो सशक्त असावा, परंतु आता मात्र फारच थकलेला, वैताग- लेला दिसत होता. कदाचित काळजीने तो अकालीच वृद्ध झाला असावा. खांद्या- वर प्रचंड ओझे असल्यामुळे वाकून चालावे तसे तो वाकून आणि सावकाश चालत एका टेबलाजवळ गेला आणि तेथे बसला.

मी अजूनही त्याच्याकडेच पाहत होतो. त्याचे मात्र माझ्याकडे लक्ष नव्हते. त्याने आपले मुंडासे काढून समोर टेबलावर ठेवले होते व त्याचे तिकडेच लक्ष होते. तो कसलातरी विचार करीत असावा. मी विचार करू लागलो, या गृहस्थाला कसली एवढी चिंता असावी? तो असा उदास का? आणि का कोण जाणे, मला त्या म्हाताऱ्याचे एक वेगळेच आकर्षण वाटू लागले. आपण त्याच्याशी बोलावे, त्याला कसली चिंता भेडसावते आहे ते जाणून घ्यावे, असे मला तीव्रतेने वाटू लागले, मी त्याच्याशी बोलण्याची संधी पाहू लागलो.

आता त्या म्हाताऱ्याने खिशामधून एक विडी बाहेर काढली. त्याची प्रत्येक हालचाल अगदी सावकाश होत होती. विडी काढल्यावर त्याने दुसऱ्या खिशातून काड्याची पेटी बाहेर काढली आणि विमनस्कपणे तो क्षणभर त्या वस्तू हातातच ठेवून बसला. क्षणानंतर मात्र तो भानावर आला आणि घाईघाईने त्याने एक काडी पेटवली. पण 'कूलर'च्या वाऱ्यामुळे ती ताबडतोब विझली. तेव्हा म्हाताऱ्याने



दुसरी काडी पेटविण्यासाठी पेटी उघडली. पण पेटीत आता काडीच शिल्लक नसावी; कारण वैतागाने म्हाताऱ्याने 'च्यामारी' अशी शिवी दिली आणि रागारागाने पेटी दूर भिरकावली.

म्हाताऱ्याच्या रागाच्या आविर्भावामुळे मला एकदम हसू आले आणि मी मुक्तपणे हसलो.

चमकून म्हाताऱ्याने माझ्याकडे पाहिले. आतापर्यंत त्याला मी येथे बसलो आहे याची त्याला जाणीवच नव्हती. त्यामुळे मला पाहताच तो थोडासा ओशाळला आणि आपल्या कृतीच्या समर्थनार्थ म्हणाला, "काय करावं हो, साली काडीच शिल्लक नाही."

मी पुन्हा एकदा हसलो. "पण म्हातारबुवा," मी त्याला म्हणालो, "एवढे पेटीवर रागावून काय होणार आहे ? या, ही घ्या पेटी. या इकडेच बसा."

म्हातारा उठून माझ्यासमोर येऊन बसला आणि मी दिलेल्या काडीने त्याने विडी शिलगावली.

"हां, आता जीव थाऱ्यावर आला बघा." धुराचा भपकारा सोडत म्हातारा म्हणाला. "लई त्रासून गेलोय सकाळपास्नं."

"का हो, काय झालं एवढं त्रासायला ?" मी उत्सुकतेने विचारले.

"ते काही विचारू नका," म्हातारा म्हणाला, "थोडसं इकडं-तिकडं फिरलं की, ह्या उनानं जीव कातावतो बघा."

मी नुसतेच 'हूं' म्हटले. म्हातारा पण मुकाट्याने विडी ओढू लागला. खोली पुन्हा एकदा अगदी शांत झाली. पण ही शांतता मात्र फार वेळ टिकली नाही. म्हाताऱ्यानेच पुन्हा बोलायला सुरुवात केली, "पन ह्या बाहेरच्या त्रासापेक्षा घरचा त्रास मात्र लई मोठा. घरी कटकट झाली की मिनिटभर शांतता मिळायची नाही बघा."

"हे मात्र अगदी खरे," मी अगदी मान डोलावत 'पाटला'च्या विधानाला संपूर्ण पाठिंबा दिला.

"आता कसं ? पटलं ना ?" अगदी खूष होऊन म्हाताऱ्याने विचारले.

"तर हो ? अहो, संसार म्हटला की बायको येणार आणि बायको म्हटली की

कटकट ही येणारच !" मी सर्व पुरुषांचे चिरंतन तत्त्वज्ञान उगाळले.

पण म्हातारा मात्र या विधानावर खवळला, "छ्या: छ्या: हे काही खरं नाही. कमीत कमी माझ्या बायकोबाबत तर काहीच नाही." म्हताऱ्याने हे विधान एवढे ठासून केले की मी अगदी चाट पडलो. अगदी आपोआपच माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडले, "खरं म्हणता ?"

"आता हो ? अन् खोटं बोलायचं मला काय कारण ?" अगदी भोळी मुद्रा करून म्हाताऱ्याने मला विचारले.

म्हाताऱ्याच्या त्या हावभावांची मला गंमत वाटली. आणि माझ्या चर्येवरून म्हाताऱ्याला तसा अंदाजही आला असावा. तो थोडासा लाजला. आणि मग मिस्कील चर्येने तो मला म्हणाला, "पण त्यात एक मेख आहे बघा. अगदी खुंटा म्हणानात का ?"

"म्हणजे काय ?" मी कुतूहलाने विचारले.

"म्हंजे असं, आमचीबी बायको सुरुवातीला तशीच होती; पण मी तवाच पाणी ओळखलं तिचं, अन् आता आमचा अगदी सुखानं संसार चालू आहे."

"अरेच्या," मी मनात म्हटले, "पाटील, लई बेरकी दिसतात." म्हाताऱ्याने काय युक्ती योजली असावी, याचे मला कुतूहल वाटू लागले. म्हाताऱ्याचा एकंदर आविर्भावही असा होता, की मला त्याची कथा ऐकावी असे वाटू लागले. म्हणून मी मोठ्या उत्सुकतेने त्याला विचारले, "युक्ती ? अन् ती कसली बुवा ? जरा आम्हांलादेखील सांगा की पाटील; पुढे-मागे उपयोगी पडेल."

माझ्या कल्पनेप्रमाणे म्हातारा माझ्या बोलण्याने खुलला. मोठ्या खुशीने विडीचा एक झुरका घेऊन तो म्हणाला, "युगती म्हणजे तशी काही नाही हो. आपलं साधं..."

म्हताऱ्याला आणखी खुलविण्यासाठी मी म्हटले, "ह्य: ! असं कुठं होतंय होय ? साधी युक्ती असती तर जगातल्या प्रत्येक नवऱ्याने आपल्या बायकोला कसं अगदी मुठीत ठेवलं असतं ! होय की नाही ?"

"आता हे बी खरंच म्हणा. पण..."

"आता ते काही नाही; पाटील, सांगाच, तुम्ही काय केलं ते"...मी.

म्हातारा विचारी मुद्रेने विडीचे झुरके ओढू लागला. काही क्षण मुकाट्याने गेल्यावर मग त्याने माझ्याकडे पाहिले–जणू नजरेनेच तो माझे मन ओळखू पाहत होता. पण माझ्या चर्येवरच्या भावाने त्याचे समाधान झाले. कारण त्याने आपली युक्ती सांगायला सुरुवात केली.

"सा वर्षामागे मी लगीन केलं. हे म्हणजे माझं दुसरं लगीन. पहिली बायको मेल्यावर एका वर्षात, माझ्या दोस्ताखातर मला हे लगीन करावं लागलं. त्याच्या नात्यातलीच हुती ना पोरगी, म्हणून अन् पोरगी पण दिसायला अगदी लक्ष्मीवानी होती. पाहिलं अन् तेथेच होकार दिला."

" अरे वा:! म्हणजे खूपच सुंदर बायको आहे म्हणा की तुमची! " मी मध्येच म्हणालो.

" त्यात काही शंकाच नाही बघा, " म्हातारा मान हलवत पुन्हा सांगू लागला. " रूपानं अगदी लक्ष्मीच होती. पण गुनानं ? नाव घेऊ नका! अगदी कैदाशीन होती. लग्नानंतर पैले दोन महिने झाक गेले, आणि तिसऱ्या महिन्याला बयेने प्रताप दाखवायला सुरुवात केली.

" म्हणजे काय करीत होती ती ?" म्हाताऱ्याने अपेक्षेने माझ्याकडे पाहताच मी गोष्टीत मला ' रस ' आहे, हे दाखविण्यासाठी विचारले.

"ते काही विचारू नका. अहो, काय करत नव्हती बया ? सरळ काय करेना; वाटेल तेव्हा झोपत होती, अन् मनाला येईल तेव्हा उठत होती. म्हायेरची माणसे आली की खुशाल घर वाऱ्यावर सोडून भटकायची. अन् काही विचारलं, म्हनलं की, असा जिभेचा पट्टा सोडायची की विचारू नका. " म्हाताऱ्याने हातवारे करीत आपल्या ' लक्ष्मी'चे गुणवर्णन संपविले.

" बाप रे ! म्हणजे अगदी भयंकरच म्हणायचं ! " मी शेरा दिला.

पण म्हाताऱ्याच्या ते लक्षात आले नाही. डोळे मिटून तो पुढे सांगू लागला, " आठवडाभर मी वाट पाहिली. म्हणलं, आज सुधारेल, उद्या सुधारेल; पण छचा: ? नावच नको !"

" मग ? " मी औत्सुक्याने विचारले.

" मग काय ? एके दिवशी सकाळीच उठलो. कामावर जायचं व्हतं, पण भवानी अजून उठली नव्हती. एकदम रागावलो मी अन् दिली एक लाथ कमरेवर ठेवून. "

" च्यायला !" मी आश्चर्याने मनातल्या मनात उद्गारले. 'पाटील' सांगतच होते, " भवानीची खात्री झाली. एक मिनिट तर अगदी गार झाली. पण सवय काय जाती होय ! लगेच जिभेला बेलगाम सोडलं सटवीनं. ऐकलं, ऐकलं नि मग रागावून सालीला दिल्या दोन-चार ठेवून फाडफाड. "

"बाप रे!"—माझ्या सुसंस्कृत मनाने ' आक्रोश ' केला.

पाटलांचा आवाज मात्र चढला होता. स्वरात धार आली होती. मला त्याचं आश्चर्य वाटू लागलं. पाटील पुढे बोलू लागले, " भलताच राग आला मला. मी धरलं तिला अन् लाथ हाणत एका खोलीत नेलं अन् कोंडून टाकलं. बायली बोंब मारतच होती. पण मी साफ बहिरा झालो. दोन तासांनंतर जेव्हा बाहेर काढलं, तेव्हा पुरी गार झाली होती. नुसता डोळा वर केला की थरथर कापत होती. मी पण रागात असल्यासारखाच वागत होतो. दिवसभर तिला काम करायला लावलं, अन् संध्याकाळी तिला समजावलं. म्हटलं, ' बाई, नीट वागशील तर माझ्यासारखा दादला नाही, अन् खराब वागलीस तर माझ्याएवढा खतरनाक कोणी नाही. ' मुकाट्याने बायकोने मान डोलवली. अन् —"

म्हाताऱ्याने मध्येच बोलणे थांबवले, आणि विडीचा स्वाद घेतला. नंतर जेव्हा तो बोलू लागला, तेव्हा त्याचा आवाज एकदम उतरलेला होता. मघाचा मनुष्य आणि आताचा मनुष्य हे जणू दोन वेगवेगळे होते! मरगळलेल्या स्वरांत तो म्हणाला, " तेव्हापासनं बायको कशी धाकात राहते. अगदी सुखाने संसार चाल-लाय आमचा. "

म्हातारा गप्प झाला, आणि एकाएकी सर्वत्र शांतता पसरली. मी चमकून म्हाताऱ्याकडे पाहिले. 'कूलर'चा थंडगार वारा येत असतानासुद्धा त्याच्या कपाळावर घामाचे थेंब उभे राहिले होते. एखादे कष्टाचे काम करून थकलेल्या माणसासारखा तो केविलवाणा दिसत होता.

एकाएकी मला विचित्र वाटू लागले. कसलीतरी अनामिक जाणीव बोचू लागली. मी घड्याळात पाहिले. खूपच वेळ झाला होता. घाईघाईने मी उठलो. " चलतो मी पाटील, " मी पाटलाला म्हटले.

पण पाटील कोठल्यातरी गाढ विचारांत गुंगले होते. हातातल्या जळत आलेल्या विडीकडे पण त्यांचे लक्ष नव्हते. का, कोण जाणे, मला एकदम त्याची कीव आली आणि मी झपाट्याने बाहेर पडलो.

दुपारचे पाच वाजले होते. दुसऱ्या दिवशीच्या केसचे मी अध्ययन करीत होतो. कामाशिवाय दुसरे कोठलेच विचार मनात येत नव्हते. सकाळची भानगड तर कोठल्या कोठे गडप झाली होती.

एकाएकी फोनची घंटी खणखणली. नाइलाजाने हातातले कागदपत्र खाली ठेवून फोन उचलला आणि विचारले, " हॅलव्, कोण आहे ?"

पलीकडून भास्करराव वकिलांचा आवाज येऊ लागला,

" कोण पत्कीसाहेब काय ?"

" हो मीच " मी उत्तरलो.

"पत्कीसाहेब एक काम पाठवत आहे तुमच्याकडे. मला जायचंय गावाला म्हणून......"

" आलं, आलं लक्षात. कोणतं काम ?"...मी.

" साधी घटस्फोटाची केस आहे. " भास्करराव सांगू लागले, " पण फारच गंमतीची केस आहे. येथे बायकोच नवऱ्याचा छळ करते आहे !"

" खरं म्हणता ?" मी आश्चर्याने विचारले. अन् एकाएकी माझ्यासमोर सकाळी 'कामाक्षी'त भेटलेले 'पाटील' उभे राहिले. " हां, म्हणजे माझ्याकडे येणारा नवरा तसाच वागला असता तर ?" पण मला त्यावर फारसा विचार करता आला नाही. कारण, भास्करराव बोलत होते—

" अहो, बायको म्हणजे काय, अक्षरशः राक्षशीण आहे. नवरा-बायकोची अक्षरशः हाणामारी चालते, सकाळ-संध्याकाळ !"

" बाप रे ! " मी मध्येच म्हणालो.

पण माझ्या या उद्‌गारांनी भास्कररावांना जास्तच उत्तेजन मिळाले. " हे तर काहीच नाही. " ते उत्साहाने सांगू लागले, " रात्री नवरा झोपला की बया सरळ त्याला कोंडून टाकते. जेवणात भरपूर तिखट टाकते. झोपला की खुशाल घागर अंगावर रिकामी करते. अन् दिवसभर कोणाच्या ना कोणाच्या गळ्यात गळा घालून हुंदडत असते ! "

" बाई आहे का कोण आहे ? " मी आश्चर्यलो.

" एकेक नमुने असतात खरे ! " समारोप करीत भास्करराव म्हणाले.

" बरं तर, पाठवून द्या त्याला. " मी म्हणालो.

" निघालाच तो आता. अर्ध्या घंटयात येईल तुमच्याकडे. भाऊराव पाटील देवरवाडीकर नाव आहे त्याचं "

" अच्छा तर " मी म्हणालो, आणि फोन ठेवून पुन्हा कामाला लागलो.

सुमारे पस्तीस मिनिटे गेली असतील नसतील, तोच बाहेरच्या खोलीतून माझा साहाय्यक आत आला.

मी त्रासून त्याला विचारले, " आता काय काढलेस ? "

" बाहेर भाऊराव देवरवाडीकर नावाचे कोणी म्हातारेबुवा आलेत. "

" अं ? " मी निरर्थक उद्‌गार काढला. क्षणभर विचार केला आणि म्हणालो, " घेऊन ये त्यांना आत. "


त्याने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले. एवढे काम समोर पडले असता, ते बाजूस सारून मी त्या सामान्य माणसाचे काम हातात घ्यावे याचे त्याला कुतूहल वाटत होते. पण त्याला काय माहीत की मी त्या 'नवऱ्या'ला पाहायला केवढा उत्सुक झालो होतो ते.

५–१० क्षणांतच बाहेर वहाणांचा आवाज ऐकू आला, आणि " रामराम साहेब, " असे म्हणत एक व्यक्ती आत शिरली.

" आं, पाटील तुम्ही ? " आश्चर्याने उभा राहत मी विचारले.

पाटील पण आश्चर्याने माझ्याकडे पाहत होते.

सकाळी 'कामाक्षी'त 'मी बायकोला युक्तीने मुठीत ठेवले' असे सांगणारा म्हातारा, आता बायको भयंकर त्रास देते म्हणून घटस्फोट मागण्यासाठी माझ्यासमोर उभा होता! ●



# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक सहावा

अरुण साधू

खायला काही मिळत नाही, म्हणून टाचा घासून मरत असलेला माणूस तुम्ही पाहिला आहे काय ? कल्पनेपेक्षाही भयानक दृश्य असले पाहिजे ते. परंतु चीनमधील शेतकऱ्यांनी एक नव्हे, दोन नव्हे, अशी हजारो माणसे अन्नाविना तडफडत मेलेली पाहिली आहेत.

पंधरा वर्षांपूर्वी चीनमध्ये दुष्काळ ही सामान्य गोष्ट होती. सुभेदार आणि जमीनदार यांनी शेतकऱ्यांना पुरेपूर पिळून काढल्यानंतरही शेतकऱ्यांना स्वस्थता नसे. त्यांच्याजवळील उरली सुरली शक्ती एखादा महापूर किंवा एखादे महाभयानक आवर्षण केव्हा शोषून घेईल याचा नेम नसे. आणि चीनमधील दुष्काळ म्हणजे मामुली नसे. तेथे भूकबळी पडत ते शेकड्यांनी नव्हेत तर लाखोंनी.

आणि जेव्हा अशा एखाद्या दुष्काळात शेतकरी पटापट मरत, तेव्हा त्यांनाच लुबाडून उन्मत्त झालेले जमीनदार, सरदार, सुभेदार त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत. चीनमध्ये किनाऱ्यावरच्या शहरांशिवाय वाहने जाण्यासाठी चांगल रस्ते असे कुठेच नव्हते. त्यामुळे शहरांतील धान्याची मदत ग्रामीण विभागांत जातच नसे. कधी कधी पाण्याचे दुर्भिक्ष्य एवढे वाढत असे की, ५० मैलांच्या परिसरात पिण्याच्या पाण्याचा थेंबही सापडत नसे.

१९२५ ते १९२९ च्या काळात चीनच्या उत्तरेकडील प्रांतांत असेच एक महाभयंकर आवर्षण पडले होते. उपासमारीने मेलेल्यांचा आकडा ३० लाख सांग-



ण्यात येत होता. पण अनधिकृत आकडा त्याच्या दुपटीहूनही जास्त होता. विशेष म्हणजे बाहेरच्या जगाला या दुष्काळाची फारशी कल्पनाही नव्हती.

## अमेरिकन वार्ताहाराने काय पाहिले ?

योगायोगाने एक तरुण अमेरिकन वार्ताहर एडगर स्नो याच सुमारास पूर्वेकडील देशांची गंमत बघण्यासाठी म्हणून चीनमध्ये आला होता. केवळ एक धाडसी प्रवास म्हणून काही मिशनऱ्यांबरोबर तो सुईयुआनमध्ये याच वेळी आला. तेथे त्याने जे प्रत्यक्ष पाहिले ते धक्का देणारे होते. तो लिहितो,

" तेव्हा मी तेवीस वर्षांचा होते. केवळ गंमतीखार म्हणून मी सुईयुआनचा बेत आखला होता. पण इथेच एकाएकी, आयुष्यात प्रथमच खायला काही मिळत नाही म्हणून टाचा घासत मरत असलेली माणसे माणसे मला दिली. ते जे भयंकर दिवस मी सुईयुआन प्रांतामध्ये घालवले त्या काळात अक्षरश: हजारो पुरुष-स्त्रिया व मुले अन्नपाण्याविना तडफडून मरताना मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिली.

" तुम्ही कधी एखादा प्रामाणिक, साधा, दुसऱ्याला मुळीच त्रास न देणारा, ज्याला महिनाभर काहीच खायला मिळाले नाही, असा माणूस कधी पाहिला काय ? अतिशय हृदयद्रावक दृश्य असते ते. त्याचे मृत मांस त्याच्या हाडांवरून लोंबत असते. त्याचे हाड्न् हाड स्पष्ट दिसत असते. त्याचे डोळे शून्यात कुठे तरी लागलेले असतात. तो जरी २० वर्षांचा तरुण असला तरी एखाद्या प्राचीन जना-

चराप्रमाणे तो खुरडत असतो. नशीबाने त्याचे लग्न झालेले असले तर त्याने आपली बायको आणि मुली अगोदरच विकली असतील......

मुलांची परिस्थिती याहीपेक्षा केविलवाणी असते. हातापायांच्या काड्या झालेल्या असतात. आणि लाकडाचा भुसा खाऊन पोटे भयानक रीतीने फुगलेली असतात. बायका कुठे कोपऱ्यात मरणाची वाट पाहत पडलेल्या असतात. त्यांची सर्वांगाची हाडे वर आलेली असतात. रिकाम्या पिशव्यांप्रमाणे स्तन लोंबकळत असतात.

" परंतु स्त्रिया आणि मुली विशेष दिसत नाहीतच. कारण, त्या एकतर अगोदरच मेलेल्या तरी असतात किंवा विकल्या तरी गेलेल्या असतात.

" ही भयानकता नाट्यमय रीतीने वर्णन करायची मला हौस नाही. या गोष्टी मी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत आणि त्यांचा मला कधी विसर पडणार नाही. अशा तऱ्हेने लक्षावधी माणसे चीनमध्ये मेलेली आहेत आणि आजही मरताहेत (१९३८). चिनी शहारांतल्या चौका-चौकांतून आणि खेड्यापाड्यांतून उपासमारीने मेलेल्या स्त्री-पुरुषांच्या प्रेतांचे ढीगच्या ढीग पडलेले मी स्वतः पाहिले आहेत......

" पण शेवटी मला जास्त कशाचा धक्का बसला असेल तो या गोष्टींचा नव्हे. धक्कादायक गोष्ट होती की, शेजारी अशा तऱ्हेने माणसे मरत असताना त्या शहरांमध्ये आणि खेड्यांमध्ये तेव्हा ही श्रीमंत माणसे, गव्हाचा, तांदळाचा भरमसाट साठा दडपणारे साठेबाज सावकार आणि नफेखोर होतेच. सशस्त्र रक्षक त्यांच्या संरक्षणासाठी असत आणि ते अमाप नफा काढीत. शहरांतले गुलछबू अधिकारी तेव्हाही गुलजार मुलींबरोबर नाचगाण्यांत दंग असत. तिथे त्यांच्याकडे महिनोगणती पुरेल एवढे धान्य असायचे. पेकिंग आणि तियेनस्तिन या शहरांत हजारो टन धान्य परदेशातून दुष्काळपीडितांसाठी येऊन पडले होते पण उपासमारीने मरणाऱ्यांपर्यंत ते पोचत नव्हते. का नव्हते ? कारण, उत्तरेकडील लष्करी सरदारांना आपल्याजवळील साठा पूर्वेकडे पाठवायचा नव्हता आणि पूर्वेकडील कोमिन्टांग सेनापतीला आपल्याकडील साठा उत्तरेकडे पाठवायचा नव्हता—आपला साठा आपले प्रतिस्पर्धी लुटतील, ही त्यांना भीती वाटत होती !

" हा दुष्काळ चालू असतानाच दुष्काळ समितीने एक मोठा कालवा बांधायचे ठरविले (अमेरिकन पैशांनी). आवर्षणाने करपलेल्या जमिनीवर पाणी सोडण्यास त्यामुळे मदत होणार होती. अधिकाऱ्यांनी या बाबतीत समितीला आनंदाने सहकार्य केले. आणि लगेच कालव्याखाली येणाऱ्या जमिनी भुकेने मरायला टेकलेल्या शेतकऱ्यांकडून अक्षरशः कवडीमोल किंमतीला विकत घेण्यास त्यांनी सुरुवात केली. साऱ्या देशातून गिधाडांप्रमाणे हे व्यापारी आणि अधिकारी या दुष्काळी विभागांत आले आणि हजारो एकर जमीन त्यांनी जवळ जवळ फुकटात पदरात पाडून घेतली...

" आणि तरीही अन्नाविना मरणाऱ्या त्या हजारो, लाखो लोकांनी तोंडांतून अथवा कृतीतून थोडाही निषेध व्यक्त केला नाही !

" हे लोक क्रांती का करीत नाहीत, असा मला प्रश्न पडला. जे त्यांच्याकडून कर वसूल करतात, पण त्यांना खायला काही देत नाहीत, जे त्यांच्या जमिनी बळकावतात, पण एखादा कालवा दुरुस्त करू शकत नाहीत, त्या राक्षसांवर हे लोक मोठ्या संख्येनिशी चाल करून का जात नाहीत ? किंवा मोठ्या शहरांमध्ये घुसून जे निःसंशय त्यांच्या बायकामुली विकत घेतात, जे सतत पंचपक्वान्नांच्या पंक्ती झोडीत असतात, त्यांना हे लोक साफ का करून टाकीत नाहीत ? का नाहीत ?

" त्यांच्या मूकपणाचे मला खरोखरच आश्चर्य वाटत होते. थोडा वेळ मला असेही वाटले की काहीही झाले तरी हे चिनी शेतकरी लढणार नाहीत.

" परंतु ही माझी चूक होती. चिनी शेतकरी कृतिशून्य नाही, तो भित्रा नाही. त्याला पद्धत दिली, संघटना दिली, नेतृत्व दिले, व्यावहारिक कार्यक्रम दिला – आणि शस्त्रे दिली तर तोही लढू शकतो..."

## क्रांती–स्टालीनची आणि माओची

माओनेही हे बरोबर ओळखले होते. त्याने शेतकऱ्यांचे दारिद्र्य जवळून पाहिले होते, नव्हे स्वतः अनुभवले होते. त्यांच्यांतील सुप्त शक्ती त्याने हेरली होती. आणि आता शाओ–शानमध्ये विश्रांती घेत असताना तो या शेतकऱ्यांना काही पद्धती, संघटना, नेतृत्व, व्यावहारिक कार्यक्रम आणि शस्त्रे कशी देता येतील याचा गंभीरपणे विचार करू लागला.

परंतु त्याचे हे विचार त्या वेळच्या पुस्तकी कम्युनिस्ट विचारांच्या चौकटीत बसण्यासारखे नव्हते. कम्युनिस्ट विचारसरणीमध्ये शेतकऱ्यांना स्थान नव्हते. असलेच तर त्यांना प्रतिगामी मानण्यात येत होते. शहरी औद्योगिक कामगार हा कम्युनिस्ट क्रांतीचा पाया असावयास हवा होता.

आणि चीनमध्येही तसे घडते आहे की नाही, यावर डोळ्यांत तेल घालून स्टालीन लक्ष ठेवीत होता.

स्टालीन हा एक एक अत्यंत दूरदर्शी कम्युनिस्ट नेता म्हणून ओळखला जातो. जगात ज्या ज्या ठिकाणी क्रांत्या झाल्या, त्या त्या ठिकाणी स्टालीनने आपल्या दूरदृष्टीने आधीच हेरून मोठ्या मुत्सद्देगिरीने डावपेच टाकून त्या घडवून आणल्या, असे कम्युनिस्ट प्रामाणिकपणे मानतात.

परंतु चीनमध्ये स्टालीनचे सारेच चुकले. चीनमध्ये जी जी पावले टाकली त्यांचा नेमका उलटा परिणाम चिनी कम्युनिस्ट पक्षावर होत गेला. इतकेच नव्हे तर १९२७ साली झालेल्या चिनी कम्युनिस्टांच्या शिरकाणालाही स्टालीनची चुकीची धोरणेच कारणीभूत ठरली.

लेनीनच्या मृत्यूनंतर स्टालीन आणि ट्रॉट्स्की यांच्यांत जी स्पर्धा सुरू झाली तिचे प्रतिबिंब चिनी कम्युनिस्ट पक्षात आणि कोमिन्टार्न सल्लागारांतही दिसत होते.

स्टालीनला चीनमध्ये शेतकऱ्यांची आघाडी नको होती. त्याने चिनी शेतकऱ्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे, तर शेतकऱ्यांना विरोध करण्याचे वारंवार सल्ले कोमिन्टार्नतर्फे चिनी कम्युनिस्टांना दिले.

परंतु माओने मात्र चीनची नाडी बरोबर ओळखली होती. जमीनदारांनी केलेली असत्य पिळवणूक, वारंवार होणारी नागरी युद्धे, लष्करी क्रांत्या, शिरकाणे, संप, दुष्काळ आणि सततचे अराजक यांमुळे दरिद्री चिनी शेतकरी जेरीस येऊन अधिकाधिक गर्तेत लोटला जात होता. हळू हळू त्यांचा असंतोष घुमसत होता. असंतोषाचे कोठार गच्च भरले होते. शेतकऱ्यांचा प्रक्षोभ वाढत होता.

या शेतकऱ्यांच्या महासागराच्या बेफाट पण सुप्त शक्तीकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले होते. पण माओ-त्से-तुंगला मात्र ही शक्ती अलीकडे जाणवू लागली होती. आणि कम्युनिस्टांच्या पुस्तकी अंधश्रद्धांनुसार या महासागरात उसळणाऱ्या प्रक्षुब्ध लाटांना थोपवून धरण्याचा मूर्खपणा करण्यापेक्षा त्याच शक्तिमान् लाटांवर स्वार होऊन क्रांतीकडे झेप घेण्याचे त्याने ठरविले.

आजारातून बरे होताच १९२५ मध्ये माओ-त्से-तुंगने शेतकऱ्यांच्या संघटनेस सुरुवात केली. यापूर्वी त्याने शहरी कामगारांच्या संघटना संघटित केल्या होत्या. आता त्याने त्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले. दिवसा कुठेतरी लपून राहून रात्रीच्या अंधारात हुनान प्रांताच्या खेड्यांत तो प्रवास करू लागला. शेतकऱ्यांना भेटू लागला. लवकरच त्याने हुनानी शेतकऱ्यांची एक बळकट संघटना तयार केली.

३० मे १९२५ रोजी शांघाय येथे विद्यार्थ्यांवर आणि कामगारांवर ब्रिटिश पोलिसांनी गोळीबार केला, त्याचे पडसाद साऱ्या देशभर उमटले. हुनानी शेतकऱ्यांनीही निदर्शने करण्यास सुरुवात केली. माओला हुनानमध्ये राहणे धोक्याचे झाले; कारण, तो कम्युनिस्ट तर होताच, पण कोमिन्टांगचाही पदाधिकारी होता. आणि हुनानवर त्या वेळी एका अत्यंत दुष्ट नि क्रूर लष्करी सरदाराची सत्ता चालू होती. त्याचे पोलिस आणि सैनिक शहरां-खेड्यांतून क्रांतिकारांना हुडकून गोळ्या घालून ठार करीत हिंडू लागले.

माओच्याही मागावर सैनिक धाडण्यात आले. त्याच्या मस्तकासाठी बक्षीसही लावण्यात आले. शेवटी माओला हुनानमधून निसटून कॅन्टॉनला जावे लागले. कॅन्टॉनमध्ये एक महत्त्वाचे काम त्याची वाटच पाहत होते.

### माओचे दोन निबंध

१९२५ च्या मार्चमध्ये डॉ. सन् यत सेन मरण पावला. त्याच्यामागून पंतप्रधान वाँग चिंग वै आणि लष्करी प्रमुख चँग-कै-शेक यांच्या हाती कोमिन्टांगची सूत्रे आली व त्यांनी उत्तरेकडील बादशाहीचे अवशेष नष्ट करण्यासाठी एक जोराची मोहीम सुरू केली.

माओ जेव्हा कॅन्टॉनमध्ये आला, तेव्हा वाँग चिंग वैने त्याला कोमिन्टांगच्या

'राजकीय साप्ताहिक' या मुखपत्राचे संपादकत्व दिले. तसेच शेतकरी संघटकांचे प्रशिक्षण आणि कोमिन्टांग चळवळ यांची सूत्रे त्याच्या हाती देण्यात आली. या जागा निश्चित महत्त्वाच्या होत्या.

आणि याच पदांवरून कोमिन्टांगच्या छत्राखाली माओने आपल्या शेतकऱ्यांच्या क्रांतीच्या कल्पनांचे आराखडे तयार करण्यास सुरुवात केली. उत्तरेकडच्या मोहिमेला सुरुवात होताच ठिकठिकाणचे सरदारी राज्यांतील शेतकरी या योजनेनुसार उठाव करून कोमिन्टांगच्या राष्ट्रीय सैन्याला मदत करणार होते.

आपल्या शेतकऱ्यांच्या संघटनांच्या अनुभवाच्या जोरावर माओने या वेळी हस्त-प्रत्रकांसाठी दोन निबंध तयार केले. चिनी समाजातील वर्गांचे विवेचन व चीन-पुढील आव्हाने, अशा तऱ्हेचे या निबंधांचे विषय होते. शेती वाटपात मूलभूत सुधारणा घडवून आणण्यासंबंधी आणि शेतकऱ्यांचे जोरदार संघटन करण्याविषयी माओने आपली मते या निबंधांत मांडली होती. पण चिनी कम्युनिस्ट नेता चेन तु हसियू याला ही मते न पटून त्याने ते निबंध कम्युनिस्ट मुखपत्रात छापण्यास नकार दिला. माओने हे निबंध नंतर दुसरीकडे प्रसिद्ध केले खरे. पण त्यांच्यातील आणि चेनमधील मतभेद तसेच वाढीला लागले आणि पुढे १९२७ साली ते विकोपाला गेले.

इकडे कोमिन्टांगमध्येही मतभेद निर्माण होऊ लागले होते. चँग-कै-शेकच्या रूपाने एक नवा प्रवाह कोमिन्टांगमध्ये आला होता. रशियाला जाऊन आल्यापासून त्याचा कम्युनिस्टांविषयीचा संशय अधिकच वाढला होता आणि त्यांच्या प्रत्येक कृत्याच्या प्रामाणिकबद्दल त्याला अविश्वास वाटू लागला होता. त्याच्या नेतृत्वाखालील कोमिन्टांगचा उजवा गट कम्युनिस्टांना पाण्यात पाहू लागला व त्यांना पक्षातून हुसकून लावण्याची संधी शोधू लागला.

दरम्यान २० मार्च १९२६ ला चँग-कै-शेकने कम्युनिस्टांनी आपल्याला पळ-विण्याचा कट केला, असा कांगावा करून कॅन्टॉनमध्ये मार्शल लॉ पुकारला. काही कम्युनिस्ट नेत्यांना अटक केली. कोमिन्टांगमधील कम्युनिस्ट सभासदांना कम्युनिस्ट पक्षाच्या आज्ञा मानण्यास मनाई केली आणि कोमिन्टांगच्या वेगवेगळ्या पदांवर असलेल्या कम्युनिस्ट प्रमुखांना जबरदस्तीने निवृत्त केले.

कम्युनिस्टांना मोडून काढण्याचा चँगचा हा पहिला प्रयत्न होता. कोमिन्टार्न प्रतिनिधींनी ताबडतोब कॅन्टॉनला धाव घेतली. बोरोदीनने चँगशी बोलणी केली आणि पुन्हा कोमिन्टांग आणि कम्युनिस्टांची हातमिळवणी झाली. लगेच कोमि-न्टांगने उत्तरेकडील मोहीम हाती घेतली. कम्युनिस्टांचा या मोहिमेला पाठिंबा होता.

## रॉय यांचे चीनमध्ये आगमन

कुठलीही मोठी घटना घडली की त्या वेळेस योगायोगाने माओ हुनानमध्येच असायचा. जणू तो अजूनही मोठ्या खळबळीपासून स्वतःला मुद्दाम दूर ठेवू पाहत

होता. ' मे चार 'च्या चळवळीच्या वेळेस तो हुनानमध्येच होता, १९२५ च्या मे-तीस विद्यार्थी उठावाच्या वेळीही तो हुनानमध्येच होता. डॉ. सन् यत सेन वारला, तेव्हा तो हुनानमध्येच होता. आणि चँग-कै-शेकच्या सेना उत्तरेकडे प्रथम हुनानच्या रोखाने चाल करू लागल्या तेव्हाही तो हुनानमध्येच होता. पण या वेळेस तो खास कामगिरीवर होता. पुढे सरकणाऱ्या क्रांतिकारक सैन्याला अन्य प्रकारे मदत करण्यासाठी तो हुनानमध्ये ठिकठिकाणी शेतकरी संघटना तयार करीत होता.

१९२५-२७ हाही काळ चीनमध्ये मोठ्या क्रांतीचा काळ मानण्यात येतो. चँग-कै-शेकच्या सैन्याने या वेळात हुनान प्रांताचा काही भाग जिंकला. कियांगसी, फुकियेन, शेकियांग, हुपेइ, अनवेइ, कियांगसू असे एक एक प्रांत लष्करी सरदारांपासून मुक्त करीत त्याने यांगत्से नदी गाठली व थोड्याच अवधीत नानकिंग व शांघाय या इतिहासप्रसिद्ध शहरांवर त्याच्या विजयी राष्ट्रीय क्रांतिकारक सैन्याने ताबा मिळवला. जेथे जेथे सैन्य पुढे जाई त्या अगोदर तेथे शत्रूच्या प्रदेशात कामगारांचे संप आणि शेतकऱ्यांची बंडे यांमुळे क्रांतिकारक सैन्याला मोठीच मदत होई. माओ-त्से-तुंगने कोमिन्टांगमध्ये तयार केलेले प्रचारक आणि शेतकरी संघटक एव्हाना चांगलेच तयार झाले होते. सैन्याच्या मदतीसाठी केलेले शेतकऱ्यांचे उठाव व संप हे त्यांचेच कर्तृत्व होते. प्रचारकांनी तर आपली कामगिरी इतकी चोख बजावली होती, की लष्करी सरदारांच्या सैन्यांच्या डिव्हिजन्सच्या डिव्हिजन्स हजारोंच्या संख्येने क्रांतिकारी राष्ट्रीय सैन्याला येऊन मिळू लागल्या.

परंतु इथेच माओचा स्टालिनशी पहिला खटका उडाला. शत्रू प्रदेशात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उठावामुळे क्रांतिकारक सैन्याला मोठीच मदत होत होती खरी, पण त्यामुळे बऱ्याच कोमिन्टांग सेनाधिकाऱ्यांचे महत्व कमी होत होते. शेतकऱ्यांवर पगडा बसत होता तो माओच्या संघटकांचाच. सेनाधिकाऱ्यांना तेच नको होते. लगेच सूत्रे फिरली आणि कोमिन्टार्न प्रतिनिधी बोरोदीनमार्फत मॉस्कोहून स्टालीनच्या चिनी कम्युनिस्टांना आज्ञा आल्या, शेतकऱ्यांच्या चळवळी थांबवा, निदान त्यांना अधिक प्रोत्साहन तरी देऊ नका.

औद्योगिक कामगारांच्या उठावाशिवाय कम्युनिस्ट क्रांती होऊच शकत नाही, या कम्युनिस्ट अंधश्रद्धेचीही माओला या वेळी पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणीव झाली.

चिनी कम्युनिस्ट पक्षातील काही गट कोमिन्टांगला मदत न करता थोडा पक्षशिस्तीच्या बाहेर झुकतो आहे, असे पाहून कोमिन्टांगच्या संयुक्त आघाडीला ' अधिक संघटित, लोकाभिमुख व क्रांतिकारक ' करण्याच्या उद्देशाने स्टालीनने आणखी एक कोमिन्टार्नचा प्रतिनिधी चीनमध्ये या वेळी पाठविला. त्याचे नाव होते मानवेंद्रनाथ रॉय.

आता कोमिन्टांगमधील तट उघड होत आले होते. शांघाय येथील व्यापाऱ्यांच्या आणि गुप्त संघटनांच्या पाठिंब्यावर चँग-कै-शेक हा कोमिन्टांगच्या

उजव्या गटाचे नेतृत्व करीत होता तर वुहान येथील कोमिन्टांग सरकारचा पंत-प्रधान वाँग चिंग वै हा डाव्या आणि मधल्या गटाचा नेता होता. काही कम्युनिस्ट डाव्या गटांत होते तर काही माओसारखे कुठल्याच गटांत नव्हते.

## कम्युनिस्टांचे शिरकाण

चँगच्या सेना शांघायपर्यंत पोचल्या, तेव्हा कम्युनिस्टांना नेस्तनाबूद करण्याचे त्याचे प्रयत्न हळू हळू उघड होऊ लागले. त्याच्या क्रांतिकारी राष्ट्रीय सैन्याला मदत करण्यासाठी शांघायमध्ये कम्युनिस्ट कामगार संघटनांनी संप आणि उठाव केले होते; पण आपले सैन्य शांघायच्या जवळ पोचताच चँगने सैन्याला थांबण्याची आज्ञा केली, हे बघून (आणि चँगच्या संमतीनेच) शांघायमधील लष्करी जनरल लि पाओ चँग याने शहरातील साऱ्या कम्युनिस्टांना आणि कामगार संघटकांना खड्यासारखे वेचून ठार मारले.

कम्युनिस्टांचे शिरकाण पूर्ण झाल्यावरच चँगने शहराचा ताबा घेतला व नंतर लगेच आपल्या सैन्यात त्याने लष्करातील जनरल ली याला एक महत्त्वाची जागा दिली. अशा रीतीने चँग-के-शेकचा कम्युनिस्ट द्वेष उघड होत होता तरी अजूनही स्टालीन आणि कोमिन्टार्न प्रतिनिधी त्यालाच क्रांतिकारकाचा नेता म्हणून गौर-वीत होते.

परंतु १२ एप्रिल १९२७ रोजी चँगने स्वतःच शांघायमधील उरलेल्या कम्युनिस्ट कामगार संघटक आणि डाव्या गटातील बुद्धिवाद्यांना पद्धतशीरपणे पकडून गोळ्या घालून ठार मारण्यास सुरुवात केली. ज्यांनी विरोध केला त्यांना तावडतोब गोळ्या घालण्यात आल्या. इतरांना काही तासांनंतर गोळ्या घालण्यात आल्या. त्याच वेळी नानकिंग येथील कम्युनिस्टांचेही असेच शिरकाण झाले. चीनमधील बहुतेक महत्त्वाच्या शहरांतील कम्युनिस्ट संघटना नेस्तनाबूद करण्यात आल्या. आणि सापडतील त्या कम्युनिस्ट नेत्यांना ठार करण्यात आले.

आपल्या 'सोव्हिएट रशिया इन चायना' या पुस्तकात चँग-कै-शेक या क्रूर आणि विश्वासघाती शिरकाणाचा उल्लेख कटाक्षाने टाळतो. तो एवढेच म्हणतो, "कम्युनिस्ट उठाव थोपवून धरण्यासाठी क्रांतिकारी सैनिकांनी स्थानिक कामगार संघटकांच्या साहाय्याने कम्युनिस्टांना निःशस्त्र केले." (!)

१२ एप्रिल १९२७ हा कम्युनिस्ट-कोमिन्टांग सहकार्याचा शेवटचा दिवस ठरला. कम्युनिस्टांचा तर तो काळा दिवस होता.

त्याच दिवशी चँग-के-शेकने नानकिंग येथे आपले कोमिन्टांगच्या उजव्या गटाचे नवे सरकार स्थापल्याचे घोषित केले. या नव्या सरकारचे जनरॅलिझिमो पद त्याने स्वतःकडे घेतले. आणि वाँगच्या कोमिन्टांग सरकारने आपणात विलीन व्हावे, असा आदेश धाडला व आपल्या लष्करी बळावर ते सरकारही नेस्तनाबूद करण्याची धमकी दिली.

दरम्यान कोमिन्टांगचे कॅन्टॉन येथील केन्द्र वुहानला आले होते. या डाव्या कोमिन्टांग सरकारला सोव्हिएट कोमिन्टार्नचा पाठिंबा होता. चिनी कम्युनिस्ट पक्षानेही वाँग चिंग वैच्या वुहान येथील सरकारला पाठिंबा दिला. पण कम्युनिस्ट आणि कोमिन्टांगचे हे उरले सुरले संबंध फार टिकावयाचे नव्हते. लवकरच डाव्या कोमिन्टांगतर्फेही उरल्या सुरल्या कम्युनिस्टांचे शिरकाण होणार होते व त्यानंतर वुहान सरकारही स्वतःच कोसळून पडणार होते.

## ऐतिहासिक उद्रेक

पण हे सारे घडायच्या अगोदर तिकडे हुनानमध्ये एका विलक्षण पर्वाला आरंभ झाला होता. माओ हुनामधून निसटून कॅन्टॉनला आला होता खरा. पण त्याने स्थापलेल्या शेतकरी संघटना अद्याप शिल्लक होत्या. १९२५-२६ च्या दरम्यान हुनानी शेतकऱ्यांमध्ये एक अभूतपूर्व अशी जागृती घडून आली होती. ठासून भरलेल्या त्यांच्या असंतोषाचा स्फोट होऊन भडका उडाला होता. आणि हुनानमध्ये ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांनी जोराचे उठाव करून स्थानिक शासकांना, जमीनदारांना नेस्तनाबूद करण्याचे सत्र आरंभिले होते. एकाएकी पेटलेल्या या वणव्याची साऱ्याच राजकीय पक्षांना भीती वाटू लागली होती.

चिनी कम्युनिस्ट पक्षालाही हुनानी शेतकऱ्यांच्या या उठावाविषयी भीतियुक्त कुतूहल वाटू लागले होते. त्यामुळे या उठावाचा अभ्यास करून पक्षाला अहवाल सादर करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाने माओला १९२७ च्या सुरुवातीस पुन्हा हुनानमध्ये धाडले.

माओने या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. चिनी कम्युनिस्ट क्रांतीच्या इतिहासाला कलाटणी देणारे हुनानी शेतकऱ्यांचे हेच ते ऐतिहासिक बंड होते. आणि शेतकऱ्यांच्या अफाट शक्तीचा क्रांतिकार्यासाठी उपयोग करण्याची ईर्ष्या बाळगणाऱ्या माओला नवी स्फूर्ती आणि नव्या कल्पना देणाराही हाच तो उद्रेक होता.

[ अपूर्ण ]


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

लेखन–वाचन

# जे नव्हते ध्यानी मनी

## *We never meant to go so far*

या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

लेखांक बारावा



माविस

घर सोडल्यापासून जवळ जवळ सहा वर्षांनंतर माविस–बार्बारा घरी निघाल्या होत्या. घरी जायची ओढ आता वाढली होतीच. पण औत्सुक्यही संपले नव्हते. सौदी अरेबिया पाहायचा राहिला होता. तेथे लवकरच प्रवासी स्त्रियांनीही बुरखा घातला पाहिजे असा कायदा पास होणार होता. असा कायदा होण्यापूर्वीच तो देश पाहावा म्हणून कराची येथून इराकी कॉन्सुलेटमार्फत परवाना मिळवून दोघींनी या देशात प्रवेश केला. आधीच देश उष्ण. उकाडा अतिशय. अशा परिस्थितीत स्त्रियांना नखशिखान्त बुरख्यात कोंडणारा हा जगातला सर्वांत मागासलेला देश इतर बाबतींत काहीसा अधिक स्वच्छ वाटला.

इंग्लिश दारू प्याल्याबद्दल गुन्हेगारांना भर रस्त्यात कानफटण्याची शिक्षा असे. दारू विलायती असली तर उजव्या हाताने तोंडात मारायची, गावठी असेल तर डाव्या हाताने. जेवढ्या थोबाडींत मारायच्या असतील त्या मोजण्याची कामगिरी बघ्यांची गर्दी करीत असे. त्याकरता भर चौकात रहदारी खोळंबून राहिली तरी चालत असे.

शिंदळकीला देहान्त प्रायश्चित्त ! फास आवळून नाही. कुऱ्हाडीने मुंडके उडवण्याचा जाहीर भव्य कार्यक्रम !! असाही एक समारंभ पाहून दोघी तेहरानला पोचल्या. तिथे इराणच्या शहाचा विवाह राणी फराह हिच्याशी नुकताच झाला होता. राणीचे फोटो दोघींनी काढले व दोघींनी तेथूनच इराकमध्ये जाण्याचा परवाना हस्तगत केला.

अठरा महिन्यांपूर्वी इराकमध्ये राज्यक्रांती होऊन जन. कासम हा सर्वाधिकारी झाला होता. दोघी बगदादला पोचल्या, त्यापूर्वीच एक–दोन दिवस कासमच्या खुनाचा प्रयत्न फसला होता. फक्त त्याच्या डाव्या दंडाला गोळी लागून जखम झाली होती.

कासमच्या चिटणिसामार्फत माविस–बार्बाराने कासमला भेटायला आलेल्या खूर्द टोळयांच्या शिष्टमंडळाशी कासमची बोलणी चालू असताना तिथे हजर राहण्याची परवानगी मिळवली. दोघी मुलाखतीच्या प्रशस्त दिवाणखान्यात शिरल्या तेव्हा कासमच्या आसनाशेजारी एका मोठ्या काचपात्रात कासमच्या रक्ताचे डाग पड-लेला शर्ट मोठ्या सन्मानपूर्वक प्रदर्शनार्थ ठेवला होता.

**कासम-भेट**

माविसने मेजर जनरल कासमला, त्याला भेटायला आलेल्या माणसांपैकी कुणाशीतरी हस्तांदोलन करीत असताना, फोटो घेऊ देण्याची विनंती केली. तो फोटो तिने मिळवला व दोघी बाहेर येऊन चहा पीत असताना शिष्टमंडळाला निरोप देऊन जनरल कासमची स्वारी तिथे आली. माविसने अगदी लाडात त्याला आणखी फोटो देण्याची विनंती केली. लष्करी माणूस खुषीत आला.

रमझान असल्यामुळे त्याला एकदाच जेवायचे होते. त्यासाठी तो उठला होता. त्याने दोघींना खाण्याची विनंती केली. परंतु त्याच्या पोटातल्या अल्सरसाठी खास तिखटविरहित मांसाहारी पदार्थ पुढे आले ते त्यांनी नाकारले. त्याची खाताना खुषीत आलेली छबी मात्र त्यांनी टिपली.

जन. कासमशी दोस्ती झाल्यावर लवकरच इंडोनेशियाचा सुकार्नो इराकला भेट देणार आहे, असे त्यांना कळले. दोघींनी मुक्काम वाढवला. ज्या दिवशी सुकार्नो विमानतळावर उतरला, तेव्हा जन. कासमबरोबर माविसही विमानतळावर हजर राहिली.

विमानतळावर उतरताना सुकार्नोने एकीकडे जन. कासमशी हस्तांदोलन करीत असताना माविसकडे पाहिले. तो मोठ्याने कासमला म्हणाला,

"ही पोरगी इथं कशी ? आणि ती दुसरी कुठे गेली ?"

मग त्याने कासमला या दोघी इंडोनेशियात आल्या होत्या, ते सांगितले. कास-मला आधीच माविसने इंडोनेशियातील सुकार्नोचे किस्से सुनवले होते. तिथपासून सुकार्नोने माविस–बार्बारांना आपल्याबरोबर सर्वत्र फिरण्याचे आमंत्रण दिले. इराक-भर दोघीजणी सुकार्नो व कासमबरोबर फिरत होत्या. सुकार्नोचे वागणे काहीसे प्रेमात पडल्यासारखे होत चालले होते. परंतु त्याची कीर्ती कानांवर असल्यामुळे माविस सावध होती. निदान ती आता तरी असे सांगते खरी !

सुकार्नोपाठोपाठ रशियाचा तेव्हाचा उपपंतप्रधान अनास्तास मिकोयान इरा-कला येणार होता. आपण ज्यू आहोत हे कळण्यापूर्वी या ज्यू–द्वेष्टया जगातून निसटावे असे माविस म्हणत होती. परंतु मिकोयान–भेटीचा थ्रिल अनुभवण्याचा मोह सुटत नव्हता.

अखेर घोटाळा झालाच. इराकी अधिकाऱ्यांनी मिकोयान आला त्याच दिवशी दोघींना ताबडतोब इराक सोडून जायचा हुकूम बजावला.

दुसऱ्या दिवशी दोघी देश सोडून जाण्याच्या खटपटीला लागणार होत्या. परंतु सायंकाळी मिकोयानचा जाहीर सत्कार होता तिथे जायला हरकत नाही, असे वाटून दोघी सभेला गेल्या. सभेच्या गर्दीत पोलिसांनी त्यांना ओळखले व बखोटीला धरून सभेतून हाकलून दिले.

माविस–बार्बारा या ज्यू आहेत, असा सुगावा इराकी अधिकाऱ्यांना लागताच त्यांनी त्या दोघींना इराकबाहेर हाकलून देण्याचे ठरवले. ना कासम मदतीला आला, की ना मिकोयान ! वंश आणि धर्म यांनीच माणसाचे राष्ट्रीयत्व ठरते ! निदान भारताबाहेरच्या अडाणी जगात तरी ! ! !

दोघींनी गाशा गुंडाळला. अरब जगात आता वावरायचे तर त्यांचे ज्यू–वांशियत्व झाकणे शक्य नव्हते. काही दिवस भूमिगत राहावे या भावनेने दोघींनी जेरूसलेमच्या यात्रेत सामील व्हायचे ठरवले. जेरूसलेमपर्यंत यात्रिकांच्या बरोबर बसने प्रवास करीत दोघी बैरूतला आल्या. बैरूतला आल्यावर त्यांनी तेथील इंग्रजी वृत्तपत्र उघडले. त्यात मोठ्या अक्षरांचा मथळा होता–

" हाकलून दिलेल्या दोन पोरींचा इराकी वकिलातीमार्फत पुनः तपास. "

या मथळ्याखाली लिहिलेला मजकूर असा होता.

" इराकी वकिलातीतील एका प्रवक्त्याने असे सांगितले की, इराकमधून नुकत्याच हाकून दिलेल्या दोन इंग्लिश मुलींच्या शोधात आम्ही आहोत. इराकमधील ज्यू जमात व इराकी लोक यांच्यांत बेबनाव करण्यासाठी त्या आल्या होत्या.

" अरब न्यूज एजन्सी वृत्ताप्रमाणे जन. कासम यांनी त्या दोघींना परत इराकमध्ये बोलावले आहे. कारण इराकी अध्यक्षांच्या नुकतेच असे नजरेस आणून देण्यात आले की, या दोन मुली हौशी प्रवासी होत्या व इराकच्या त्या पाहुण्या होत्या. जन. कासम यांनी या दोघींसाठी बैरूतलाही चौकशी करण्यास सांगितले आहे. "

एकंदर रागरंग पाहून दोघींनी कासमचे निमंत्रण मनावर न घेण्याचे ठरवले. बैरूतच्या ब्रिटिश वकिलातीच्या सल्ल्याप्रमाणे दोघींनी कैरोला जाण्याचे ठरवले.

कैरोला दोघी एका हॉटेलात उतरल्या व सिनेमाला जाऊन बसल्या. इकडे हॉटेलातून त्यांचा पत्ता काढीत काही वृत्तपत्रकार आले. त्यांनी सिनेमानंतर दोघींना गाठून 'मुलाखत द्या' असा आग्रह धरला. दोघींना आता या दगदगीचा कंटाळा आला होता. त्यांनी मुलाखतीस व फोटो काढण्यास नकार दिला व कैरोतील दिवस एकांतवासात घालवण्याची इच्छा व्यक्त केली.

### 'माविस–माविस' सुकार्नो पुटपुटला

परंतु दैव निराळेच चितीत होते. जन. कासमचा पाहुणचार घेऊन पुढे सरकलेले सुकार्नो महाराज कैरोत येऊन दाखल झाले होते. तेथल्या विश्वविद्यालयात त्यांचे भाषण होते. त्या भाषणाला दोघी गेल्या. सुकार्नो तरुण स्त्रियांचे चेहरे सहसा विसरत नसे ! ओळखलं नि काय ! भाषणानंतर सुकार्नोने दोघींना गाठलेच. विनंती

केली की, अध्यक्ष नासरबरोबर नाईल नदीत जलविहार, विचारविनिमय व भोजन असा कार्यक्रम ठरला आहे. त्याला दोघींनी यावे.

हा मोह टाळणे दोघींना अशक्यच झाले.

सुकार्नोच्या परिवारात दोन लष्करी अधिकारी, दोन मंत्री, त्याच्या खासगी विमानातील दोन हवाईसुंदरी व माविस-बार्बारा इतकी माणसे होती.

जेवताना बार्बाराला कुणीतरी तिचा परिचय विचारला. तिने बार्बारा असे नाव सांगताच सुकार्नोने माविसला विचारले, " तुमचंही नाव बार्बाराच का ? "

इतके दिवस माविसचे नाव बार्बाराच आहे असे सुकार्नो समजत होता. बार्बाराने माविसकडे बोट दाखवून सांगितले, " हिचं नाव माविस रॉन्सन. "

माविस हे नाव सुकार्नोला फार आवडलं. जेवताना तो पांच-सात वेळा पुटपुटला, ' माविस...माविस. ' जेवण झाल्यावर सुकार्नोने माविसला एकीकडे नेऊन विचारले, " माझ्याबरोबर पिरॅमिड पाहायला येणार का ? " माविस सावध होती. तिने सांगितले,

" एकटी कशी येऊ ? आईची सक्त ताकीद आहे बार्बाराला, की माविसला कुठेही एकटं जाऊ द्यायचं नाही. "

सुकार्नो आता चांगला धीट झाला होता. त्याने बार्बाराला भेटून विचारले,

" हिला एकटीला जायला काही हरकत आहे का ? " बार्बारा म्हणाली, " मीच का येऊ नये ? "

सुकार्नोची निराशा झाली. हा प्रकार झाल्यावर इंडोनेशियन अधिकाऱ्यांनी माविसला विनंती केली की, " आता झालेले संभाषण कृपया वृत्तपत्रांत छापू नका. "

माविसने आपल्या प्रवासपत्रांत हा प्रकार सांगितला असला तरी त्या वेळी तो वृत्तपत्रांत तिने प्रसिद्ध केला नव्हता. सुकार्नोसह त्या दोघींनी पिरॅमिड्स पाहिले, उंटावर बसल्या, आस्वान धरण पाहिले.

नासरच्या राज्यात ज्यूंवर फारसा दात नव्हता. याचा अर्थ ज्यूंबाबत त्याचे धोरण काहीसे ढिले होते, एवढेच. परंतु यामुळे दोघींच्या मनावरचे दडपण कमी झाले.

नासरच्या परिवारातही वृत्तपत्रकारांच्या ओळखीने माविस-बार्बारा दाखल झाल्या. नासरपाठोपाठ त्याच्या दौऱ्यात खेडेगावांत त्या मोटारीतून फिरल्या. नासरवर लोकांचे विलक्षण प्रेम आहे. त्याच्या मोटारीभोवती लोकांचा एवढा गराडा पडत असे की प्रत्यही मारहाण करून पोलिसांना वाट मोकळी करावी लागत असे. या चेंगराचेंगरीत एकदा एका पोलिसाने कमरेच्या पट्टयाचा एक रट्टा नासरच्याच हातावर मारला. याच जनसंमर्दात बार्बाराचा गॉगल गेला. पायातला एक बूट गेला.

नासर हा सुकार्नोसारखा बालिश नाही किंवा स्त्रीलंपटही नाही. लोकांमध्ये फिरताना आपल्या अधिकाराचा आब राखून तो वावरतो. यामुळे माविस-बार्बारांना सुकार्नोची शिडी हाताशी असूनही नासरपर्यंत पोचता आले नाही.

**मायदेशी आगमन**

लिबिया, अल्जिरिया, ट्यूनिशिया, मोरोक्को, स्पेनमार्गे दोघी आता वेगाने लंडनकडे निघाल्या. जसजसा प्रवास संपत आला तसतशी छायाचित्रे घेण्याची सुरसुरी थंडावत चालली, असा माविसला अनुभव आला. एवढे धाडस पत्करून पाच वर्षे भ्रमन्ती केली त्याच्याअखेर आपण काय मिळवले, हा विचार दोघींना अस्वस्थ करू लागला. झालेल्या घटनांकडे आता तिन्हाईत म्हणून पाहताना आपण काय काय धोके पत्करले हे लक्षात येऊन दोघींना काहीसे समाधान व अभिमान वाटला. 'ध्यानी मनी नव्हता' अशा या प्रवासात भेटलेला कालघन कुठे होता कुणास ठाऊक ? त्याच्या त्या मोडक्या जीपचे छायाचित्र फक्त त्यांच्याजवळ होते.

माविस-बार्बारांच्या वेषभूषेत खूप फरक पडला होता. लंडन जवळ येऊ लागले तसतशी त्याची जाणीव त्यांना होऊ लागली. दोघींनी स्वतःचे केस स्वतः कापले होते. त्यामुळे लंडनच्या तरुण मुलींच्या फॅशनपेक्षा अगदी वेगळा घाट आता त्यांच्या चेहऱ्यांना आला होता. भारतीय रेशमी कापडाचे झगे नकळत आता गुडघ्याखाली आले होते. झग्यावर पायात सँडल्स घालणे ही गोष्टही त्या सराईतपणे करीत होत्या. आखूड झगे व उंच टाचांचे बूट त्यांना अनावश्यक वाटू लागले होते. जणू सगळे लंडनच त्यांच्या स्मृतीतून आता घरंगळले होते.

त्यांचे विमान लंडनच्या विमानतळावर उतरले. दोघींच्या आईवडिलांनी त्यांना मिठ्या मारल्या. आता घरी जायचे म्हणून त्या मोटारीकडे वळल्या तोच २-३ माणसे लगबगीने पुढे झाली. मोठी हसतमुख आणि छान माणसे होती. त्यांनी पुढे होऊन दोघींना सांगितले, " आज रात्री तुमचा कार्यक्रम आहे. " दोघींनी बुचकळ्यात पडून विचारले,

" कसला कार्यक्रम ? "

त्या मंडळींनी बी. बी. सी. वरील कार्यक्रमासाठी दोघींना विलक्षण गळ घातली. कार्यक्रम टेलिव्हिजनवरही दिसणार होता.


त्या रात्री बी. बी. सी. वर श्रोते ऐकत होते. " मेनाडो बेटावर आपण अडकून पडला किंवा इंडोनेशियात आपण स्वतः लढाई पाहायला गेलात तेव्हा कधी भीतीने तुमची गाळण उडण्याचा प्रसंग आला का ? "

" छे, छे, " दोघी सांगत होत्या. टेलिव्हिजनवर मात्र प्रेक्षक पाहत होते, कॉफी पिताना दोघींचे हात थरथरत होते, कॉफी सांडत होती. नुसत्या त्या रोमांचकारी आठवणींनी.

[ समाप्त ]

**रा. म. शास्त्री.**

पुस्तके



# आत्मविश्वासाचा प्रौढ विलास

श्री. आप्पासाहेब फडके यांच्या ‘ प्रतिभासाधन ’ ग्रंथानंतर पस्तीस वर्षांनी त्यांचा ‘ प्रतिभाविलास ’ हा नवा ग्रंथ समोर येत आहे. प्रतिभेच्या साधनेला पूरक असा हा तिचा विलास आहे, असे स्वत: फडके म्हणतात, ते सार्थ आहे. या ग्रंथा-कडे एक शास्त्रीय ग्रंथ म्हणून पाहिले पाहिजे, साहित्यकृती म्हणून नव्हे. पण समजा, ती साहित्यकृती मानली तर अशा कृतीला स्वत: फडके यांनी सांगितलेला निकष लावता येईल. कलावंत ‘ काय ’ सांगतो याला महत्त्व नसून, ‘ कसे ’ सांगतो यातच कलेचे मर्म व मोठेपण असते, हा त्यांचा निकष. तो लावून म्हणता येईल की प्रतिभाविलासमधील सारे प्रतिपादन सुंदर नेटकेपणाने व कुशलतेने केलेले आहे. ‘ विलास ’ शब्दाने सूचित होणारा मोकळेपणा, थोडी स्वच्छंद स्वैरता मात्र या ग्रंथात नाही. ढाल आणि तलवार घेऊन, प्रतिस्पर्ध्याची मर्मे शोधीत बचावाचे व चढाईचे पवित्रे टाकणाऱ्या वीरांची सावध पावले पडतात, तसे या ग्रंथातील युक्तिवाद आहेत. कसे सांगावे याचा स्वत:चा आदर्श आप्पासाहेबांनी रूढ केला, त्याचे पूर्ण रूप या ग्रंथात दिसून येते.

आपली साहित्याबद्दलची भूमिका त्यांनी पहिल्या पाच प्रकरणांतून मांडली आहे. पुढची पाच प्रकरणे ‘ प्रचार, ’ ‘लोकसाहित्य, ’ ‘ अश्लीलता ’ व ‘ नवसाहित्य ’ अशा काही अलीकडच्या व चालू प्रश्नांबाबत आहेत. या प्रकरणातील त्यांचे विवेचन प्रश्नांच्या मळाशी जाणारे नाही; परंतु तरीही त्यांनी घेतलेले आक्षेप योग्य आहेत. अलीकडच्या साहित्यनिर्मितीमध्ये आढळणारे अतिरेक व दोष दाखवून ते टाळाव-यास हवेत, हा त्यांचा उपदेश आहे. तो रास्त नाही, असे कोण म्हणेल ? पण असे मात्र जाणवते की, हा एक वडीलधाऱ्या पण अलिप्त माणसाचा, तटस्थ व थोडा कोरडा, सहानुभूतीचा स्पर्श नसलेला उपदेश आहे. पस्तीस वर्षांत मराठी साहित्या-मध्ये जी भर पडली ती सगळीच मोलाची नाही हे खरे. पण त्यात जे मोलाचे आहे

ते दिसणे फारसे कठीण नव्हते. पण या पाच प्रकरणांतून त्यांनी केलेले विवेचन वाचले तर असे वाटते की, आप्पासाहेबांच्या रसिक वृत्तीने येथे डोळे झाकून तर घेतलेले नाहीत !

पहिल्या पाच प्रकरणांबाबत मात्र असे म्हणता येणार नाही. आपली भूमिका ते स्पष्टपणे मांडतात, आत्मविश्वासाने व मनोमन खात्रीने प्रतिपादन करतात. ही भूमिका समजावून घेणे इष्ट होईल. साहित्यकृती निर्माण होणे ही एक साखळी-सारखी विशिष्ट मानसिक प्रक्रिया आहे, ही त्यांची भूमिका. ती मूलतः मानस-शास्त्रीय आहे. परंतु गेष्टाल्ट मानणाऱ्या मानसशास्त्रांच्या आणि स्तररचना मान-णाऱ्या फ्राईडप्रभृती शास्त्रज्ञांच्या मानसशास्त्रातील उपपत्ती ते डावलतात. आणि केवळ सहजप्रवृत्ती, प्रतिक्षिप्त क्रिया, प्रेरणा, वासना व भावना अशा मानसशास्त्रा-तील पूर्वसरींच्या कल्पनांवरच ते पूर्ण भिस्त ठेवतात.

## एकांगी मानसशास्त्र

त्यांनी मानलेली साखळी—अशी एक घटना, तिचा लेखकाच्या अंतःकरणावर उत्कट आघात, त्यामुळे अनावर भावनेचा उद्‌गार, त्या उद्‌गाराचा नटवून सज-वून आविष्कार म्हणजेच साहित्यकृती. सामान्य माणसाला घटना दिसल्या, अनु-भवाला आल्या तरी त्याला ‘ प्रतिभा ’ नावाचे सहावे इंद्रिय नसते, लेखकाला ते असते. म्हणून पुढची साखळी सांधली जाते. या साखळीतल्या ‘ भावना ’ या दुव्यांना ते फार महत्त्व देतात. साहित्याचा व्यापार ही भावनांची देवघेव आहे. ती लेखक व रसिक यांत घडत असते. उपजत प्रेरणांमुळे वासना व वासनांमुळे भावना उपज-तात, याचे अवधान सुटल्यामुळे रसांच्या उपपत्तीबद्दल व संख्येबद्दल वायफळ वादंगे झाली, असा अहेर फडके जुन्यानव्या विमर्शकांना करतात. इतका आपल्या मानस-शास्त्रावर त्यांचा भक्कम विश्वास आहे. ‘ प्रतिभे ’ची व्याख्या पाश्चात्त्य समीक्षकांना करता आलेली नाही, बिचाऱ्या मराठी विमर्शकांना तरी नाहीच नाही. रसाचे मर्म भरतमुनींनाच कळलेले नाही. मग जावडेकरांना कोठून कळणार ? अशा तऱ्हेच्या धाडसी आत्मविश्वासाचा आधार म्हणून घेतलेले आप्पासाहेबांचे मानसशास्त्र अशास्त्रीय आहे, असे म्हणणे साहस होईल. पण ते मानसशास्त्र एकांगी मात्र आहे. साहित्यिक निर्मितींत व रसिकतेत भावनांची देवघेव असते, एवढे सांगून साहित्याचे मर्म सांगण्याची कामगिरी पुरतेपणी पार पडली, असे आप्पासाहेब मानतात. पण हे बरोबर आहे का ? कारण, साहित्यात, सर्वच कलांमध्ये, मानवी मन साकल्याने गुंतते, आणि प्रगट होते. सहजपणा व उत्स्फूर्तपणा, उत्कटता व आवेग कलेत असतो, पण म्हणून कलेचा अनुभव केवळ भावनात्मक असतो, ही भूमिका घेता येत नाही. ती फार एकेरी, पातळ व संकुचित उपपत्ती ठरते. कलावंताचे व रसिकाचे समग्र व्यक्तित्व, त्याचे वैयक्तिक व सामाजिक संस्कार आणि त्याला प्राप्त होणारे वास्तव यांचा साकल्याने विचार केला तरच कलेचे मर्म थोडेफार अवगत होते.

आप्पासाहेबांच्या भूमिकेत प्रेरणा, वासना व भावना यांना इतके महत्त्व दिले गेले आहे की, कलावंत हा काही नवीन रचना करतो, याचे भान त्यांच्या उपपत्तीत राहू शकत नाही. रचनेच्या मंत्रतंत्रांबद्दल फडके फार काटेकोरपणे पाहतात व लेखक म्हणून कादंबरीच्या रचनेला फार महत्त्व देतात. 'विषयाला' महत्त्व नाही या टोकालाही जाऊन त्यांनी थोडे प्रतिपादन केले आहे. पण मूलभूत उपपत्तीच्या बाबतीत साकल्याची व रचनेची बाब नजरेआड करून कसे चालेल ?

**समर्थ निरूपण**

एकंदरीत, कलेच्या जटिल व साकल्यनिर्भर स्वरूपाला सरल, सहज मानशास्त्रीय बैठक देण्याचा आप्पासाहेबांचा प्रयत्न त्यांना जरी मनोमन पटलेला असला, तरी प्रत्येकालाच तो पटेल असे नाही. याचे प्रत्यंतर त्यांच्या 'रस' या कल्पनेवरील भाष्यात नीटच येते. वादंगाचे जंजाळ लीलेने तोडून, प्राचीन-अर्वाचीन उपपत्तींना ते साफ करतात. आणि या सपाट भूमीवर 'हर्ष' व 'क्षोभ' हे दोन, व दोनच रस स्थापन करतात. 'हवं' व 'नको' यावरच जर सारा मानवी मनाचा खेळ आहे तर या दोन वृत्ती मानाव्या, हेच दोन स्थायीभाव मानावे, मग हवे ते मिळाल्याचा हर्ष व न मिळाल्याचा क्षोभ, हे दोनच रस मानावे. किती सोपे व सरळ गणित आणि मानसशास्त्र आहे ? दुर्दैव हे की, इतरांना ते पूर्वी कधी सुचले नाही.

आप्पासाहेबांच्या ग्रंथातील उपपत्तीचा परामर्श घेताना, टीका करताना, पर्यायी उपपत्ती कोणती ते सांगणे शक्य नव्हते. ते फक्त मी सूचित केले. अशा पर्यायी भूमिकेची जाणीव फडके यांना आहेच. त्या भूमिकेचा अंशत: स्वीकार करून संभाव्य आक्षेप निवारण्यासाठी, त्यांनी ठिकठिकाणी संरक्षक भिंती घालून ठेवलेल्या आढळतात. हार्डी, गॉर्की, टॉलस्टॉय व गटे प्रभृति परकीय साहित्यिकांची व कालिदासापासून हरिभाऊपर्यंतच्या भारतीय लेखकांची साक्ष त्यांनी वारंवार काढलेली आहे. पण, या कलावंताची प्रतिभा व त्यांच्या वृत्तीचे मोठेपण आपल्या नीटस पण निरुंद उपपतीत मावू शकत नाही, याची दखल त्यांनी घेतलेली नाही. त्यांच्या आकर्षक व जोरदार युक्तिवादामुळे वाचकांना असा भास होण्याचा मात्र संभव आहे, की त्यांची उपपत्ती सर्वसमावेशक आहे. असा भास व्हावा, अशी समर्थ निरूपण शैली त्यांच्या प्रतिभासाधनेत पूर्वी अनुभवाला आली. प्रस्तुत ग्रंथात तर ती शैली आत्मविश्वासाच्या प्रौढ विलासाने आणखी शोभणारी झाली आहे. ही शैली हेच मला वाटते, या ग्रंथाचे खरे वैशिष्टय व सौंदर्य असले, तरी ते सर्व रसिकांना अभ्यसनीय झाले आहे.

दि. के. बेडेकर

[ आकाशवाणीच्या सौजन्याने ]

# जातीय झळा

# आणि कळा !

" हाडं जाळणारी,
शरीराचं भस्म करणारी
पशुता, (तसला रानटीपणा),
पोटात जोपासणं (जोपासावी लागणं)
यापरती कठीण (यातनामय) गोष्ट
दुसरी कोणती असू शकेल ? "

श्री. हमीद दलवाईंच्या 'इंधन' या कादंबरीच्या सुरुवातीला पंजाबच्या श्रेष्ठ कवयित्री अमृता प्रीतमा यांच्या वरील ओळी उद्धृत केल्या गेल्या आहेत. या कवयित्रीला १९४७ सालच्या भारत-पाकिस्तानच्या विभागणीच्या काळात पंजाब-मध्ये घडलेले विलक्षण रौद्र हत्याकांड पाहावे लागले. श्री. हमीद दलवाईंच्या निवेदकालाही चिपळूणजवळील एका खेड्यात भडकलेल्या जातीय विद्वेषाच्या ज्या झळा अनुभवाव्या लागल्या त्यांची ही कथा आहे.

प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे संपूर्ण विश्रांतिसाठी आपल्या गावी गेलेल्या एका राजकीय कार्यकर्त्याच्या शब्दांत ही हकीकत सांगितली गेली आहे. आपली माणसं आणि आपलं गाव यांची पंधरा वर्षांनी त्यांची पुनर्भेट झालेली आहे. गावाविषयीची शैशवकालीन भावविवशता पूर्णपणे ओसरली आहे. काही जुने धागे, स्मृतींचे काही निर्देश फक्त उरले आहेत. त्यातही कोणत्याही प्रकारचा रस नाही, स्वप्नाळूपणा नाही. दरम्यानच्या काळात अधिक विस्तृत अशा राजकीय आंदोलनात सापडल्या-मुळेही त्याच्या वृत्तीलाही एक विशिष्ट प्रकारचा समतोलपणा लाभला आहे. सर्व कादंबरी या अलिप्त वृत्तीनं लिहिली गेली आहे.

कादंबरीचं निवेदन जसजसं पुढं सरकत जातं तसतसं या अलिप्ततेमुळे निर्माण झालेल्या दोन पूर्णपणे वेगळ्या अशा प्रवाहांची जाणीव होऊ लागते. निवेदक जेव्हा आपली वहिनी, वडीलभाऊ, आपले वडील यांविषयी सांगतो, त्या वेळी ही अलिप्तता मोठी मनोहर, भावपूर्ण आणि सूचक रूप धारण करते. भावनेचा तोल न सांडता आणि त्या व्यक्तीविषयीच्या आपुलकीला, सहानुभूतीला धक्का न लागता झालेलं हे

निवेदन निदान मराठीत तरी अपूर्व वाटावं इतक्या कलात्मक पातळीवरचं आहे. प्रत्यक्षात या व्यक्ती कशा होत्या, कशा दिसत, वागत असाव्यात हा प्रश्नच इथे गौण आहे. आपल्याला फक्त निवेदकाच्या मनातली त्यांची व्यक्तिमत्त्वे, त्यांची रूपे दिसतात. आणि ही रूपे मोठी विलोमनीय आहेत.

परन्तु जे सांगण्यासाठी ही कादंबरी जन्माला आली, त्या जातीय वैराविषयी, ते वाढविण्याला कारणीभूत होणाऱ्या प्रसंगांविषयी जेव्हा लेखक निवेदन करतो तेव्हा या अलिप्ततेचं दुसरं, न टाळता येणारं आणि धोकादायक असं स्वरूप प्रकट होतं. ते निवेदन वृत्तपत्रीय होतं, रिपोर्टासारखं वाटू लागतं. दुर्दैवानं कथेचा हाच भाग मोठा आहे, महत्त्वाचा आहे.

## पंधरा-वीस वर्षांतील दुरावा

या सर्व कथानिवेदनाला राजकारण, गावातलं राजकीय पक्षोपपक्षीयत्व यापासून कटाक्षाने दूर ठेवण्यात आलं आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत आपल्या खेड्यापाड्यांतून खूप राजकीय 'जागृती' झाली आहे. म्हणजे आपापला कार्यभाग साधण्यासाठी माणसं वेगवेगळे राजकीय गट स्थापीत आहेत. आणि आपापलं सामर्थ्य प्रस्थापित करण्यासाठी कारणं हुडकीत आहेत. ती कोणती असावीत यांचा विधिनिषेध नसतो. ती जवळ जवळ तयारच असतात. कुत्र्याला गोळी घालण्याआधी ते कोणत्यातरी कारणामुळे वाईट ठरवावं लागतं, तसं या गटांपाशी इतर गटांना वाईट ठरविण्याची राजकीय, धार्मिक, सामाजिक, जातीय अशी अनेक कारणं असतात. मधल्या पंधरा वर्षांच्या दुराव्यामुळे निवेदकाच्या मनात जनमनांतून वाहणाऱ्या या आणि असल्या विचारांच्या, भावनांच्या समजुतीबाबत जी पोकळी निर्माण झाली त्यामुळेही असं घडलं असेल. गावातली माणसं, विशिष्ट परंपरेतून घडत आलेले त्यांचे स्वभाव-विशेष, नैसर्गिक, भौतिक, भौगोलिक, सामाजिक परिस्थितीने केलेली त्यांच्या मनाची घडण याविषयींची निवेदकाच्या मनातील ही पोकळी, त्याविषयीचा त्याचा अपरिचितपणा निवेदनातून स्पष्टपणे दिसल्याशिवाय राहत नाही. लेखक या माणसांच्या अंतरंगात शिरण्याचा प्रयत्नच करीत नाही. ते काम तो वाचकांवरच बहुधा सोपवीत असावा. कथेतली माणसं आणि जातीय वैमनस्याचा भडका उडेपर्यंतच्या घटना यांचं त्यामुळेच निवेदकाच्या मनात संपूर्ण संघटन (Synthesis) झालेलं आहे, असं वाटत नाही.

त्यामुळे गावातल्या इतर माणसांविषयी आणखी काहीतरी सांगण्यासाठी सुमती, सुदामाची सून, परटीण इत्यादी कथेच्या प्रवाहापासून अलग असणारी पात्रे आली आहेत. एरवी ती का यावीत, हा वाचकाला प्रश्नच पडतो. या व्यक्ती 'तशा' प्रदर्शनीय आहेत. आहे त्याहून कथेचा विस्तार मोठा असता तर त्यात ती सामावून गेलीही असती. या व्यक्ती बाजूला काढल्या तर 'इंधन'चं दीर्घकथेचं स्वरूप स्पष्ट होतं. ती तशीच लिहिली नसती तर अधिक बांधीव व नेटकी वाटली असती.

लेखकानं जाणून बुजून वाळगलेल्या किंवा पंधरा वर्षांच्या दुराव्यातून निर्माण झालेल्या अपरिचितपणामुळे, सर्व कादंबरी वाचल्यानंतरही सुरुवातीला उद्धृत केलेल्या अमृता-प्रीतमच्या शब्दांतील आर्ततेचा प्रत्यय येत नाही. अनेक शतकं एकोप्यानं नांदलेल्या या दोन जातींना एकमेकांच्या जिवावर, स्त्रियांच्या अब्रूवर उठण्याइतकं शत्रुत्व करावं लागलं या घटनेतच विलक्षण असं एक कारुण्य आहे. जाणत्या, संवेदनाक्षम मनाला या घटनेनं काच लागतो. हे शत्रुत्व माणसांची हाडं पोखरतं. 'इंधन' मध्ये या आंतरिक वेदनेची जाणीव प्रत्ययाला येत नाही.

श्री. हमीद दलवाईंसारख्या संवेदनाशील लेखकाकडून याची अपेक्षा निश्चितपणानं होती. त्या पातळीचे कलात्मक निर्मितीचे पुरावे 'इंधन' मध्येच आहेत. निवेदक परत मुंबईला निघताना त्याचं आपल्या भाबीशी जे बोलणं होतं त्यात ती म्हणते :

"मी कुनाचा काय केलां होतां? का माझ्यावर ऐसो प्रसंग येवो? माझ्या इज्जतीत मी ऱ्हेन होतं. दुसरी कसलीच तमा नव्हती मला. तीच का हुटतेन? आता माझ्याशी ऱ्हेलाच काय? आणि तुमी बी काय केलांव? काय केलांव?"


या मोजक्या शब्दांत दलवाईंनी त्या स्त्रीचा झालेला अपमान, तिचा असहायपणा, माणसामधला तिचा ढळलेला विश्वास, तिची आंतरिक व्यथा मोठ्या समर्थपणे उभी केली आहे.

या लेखकाचा आवाका मोठा आहे. अनुभूती श्रेष्ठ प्रतीची आहे. 'इंधन' फक्त पहिलेच पाऊल आहे.

मंगेश पदकी

**[ प्रतिभा विलास : लेखक– ना. सी. फडके. प्रकाशक – विश्वकर्मा साहित्यालय, पुणे. ]**

**[ इंधन : लेखक – हमीद दलवाई : मौज प्रकाशन, मुंबई ]**



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ वडीलशाही मुर्दाबाद !

लहान मुलांवर फार वडीलशाही गाजवली तर त्यांना दम्याचा विकार जडतो, असे एका डॉक्टरने लंडनला एका परिषदेत सांगितले. – तरीच ! लहानपणी गोटचा खेळण्याच्या भरात होमवर्क राहिल्याची आठवण वडिलांनी करून दिली, की मला नेमका ताप आल्यासारखे वाटायचे, पोटात दुखायला लागायचे किंवा कमीत कमी 'कसेसेच' व्हायला लागायचे. ते का, याचे वैद्यकीय–रहस्य आता इतक्या वर्षांनी उलगडले. गंमत अशी की, आमचे चिरंजीव नेमका हाच वैद्यकीय प्रयोग आमच्यावर करीत असतात. पण आताचे वैद्यक–विज्ञान आमच्या काळच्या मानाने खूपच पुढे गेलेले असल्याने आमच्याप्रमाणे सगळ्या विकारांची एकत्र गल्लत न करता चिरंजीवांनी आपल्या हुकमी रोगांची पद्धतशीर वर्गवारी करून ठेवली आहे.

उदाहरणार्थ, अभ्यास राहिला असला आणि आईच्या संरक्षक ढालीचाही वडीलशाहीशी सामना करायला उपयोग होणार नाही, असा अंदाज आला की एकदम त्यांच्या पोटात दुखायला लागते. ( –जोपर्यंत पोटदुखीचे थर्मामीटर निघालेले नाही तोपर्यंत लहान मुलांची पोटे अशीच – बाका वखत आला की – दुखत राहणार ! ) पतंग उडवताना आईने बाजारात जायला सांगितले की अचानक पाय दुखायला लागतात. वरण–भाताचा कंटाळा आला अन् शिरा खायची लहर आली, की पोटात मळमळायला लागते. अन् शाळेला दांडी मारायची असली की अर्थात जालीम उपाययोजना करावी लागते, अन् ती म्हणजे ताप आल्यासारखे वाटते. ( – हे वाटणे फार महत्त्वाचे आहे; कारण ताप आलाय असे म्हटलेले आईला पटले तरी थर्मामीटरला पटायचे नाही. ) सांगायचा मुद्दा काय, वडीलशाहीच्या अनेक प्रकारांचे अनेक घातक परिणाम होत असतात, पण आजच्या बालपिढीने वडीलशाहीच्या प्रत्येक विकारावर उतारा शोधून काढला आहे. कोण म्हणतो बाल-बुद्धी म्हणजे बालिश बुद्धी !

## □ सूर्याचा नाइट-शो

देवाने घडवलेल्या सृष्टीत बऱ्याच उणीवा आहेत, हे मला मान्य आहे. उदाहरणार्थ देवाने पाणी तयार केले, पण त्याला कोका कोला जमला नाही. त्याने कोंबडी

जन्माला घातली पण तो तंदूरी चिकन करू शकला नाही. त्याने कणसे उगवली पण पॉपकॉर्न केले नाही. त्याने झाडांच्या पानांत क्लोरोफिल घातले पण त्याला ते टूथपेस्टमध्ये कसे घालावे हे समजले नाही. त्याने कापसाची झाडे व लोकरीच्या मेंढ्या केल्या, पण टेरीलीन, टेरीवूल, नायलॉन, डेक्रॉन बिचाऱ्याला माहीततही नव्हते.

देवाने केलेल्या असल्या बऱ्याच चुका माणसाने सुधारून घेतल्या आहेत. पण आता मात्र माणसाचा शहाणपणा माणसालाच नडायची पाळी आली आहे. अमेरिकेत म्हणे रात्री सूर्यप्रकाश कसा पाडता येईल यावर संशोधन सुरू झाले आहे. काय हा अनाठायी उद्योग ! मी म्हणतो हवाय कुणाला रात्रीचा सूर्यप्रकाश ? चोर-दरोडे-खोरांपासून प्रियकर-प्रेयसींपर्यंत कुणाचेही मन रात्रीच्या सूर्यप्रकाशाला अनुकूल असेल, असे मला वाटत नाही. एक तर रात्री सूर्यप्रकाश पडला तर रात्र कशी ओळखायची ? दुसरे म्हणजे आपोआप रात्रीचा दिवस झाला की एखादे काम आपण रात्रीचा दिवस करून केले अशी खरी खोटी फुशारकी मारायची सोय नाही. तिसरे म्हणजे सूर्य डबल-ड्यूटी करू लागला कीं चांदोबाला रिट्रेंच करावे लागणार, अन् मग चांदण्यांचे लेबर युनियन 'स्वर्ग-बंद'ची नोटीस दिल्याखेरीज थोडेच स्वस्थ बसेल ? आणि मुख्य म्हणजे रात्रीचा दिवस झाला, की रात्रपाळीचा उप-संपादक डुलक्या केव्हा घेणार ? छे, छे ! या अविचारी अमेरिकन माणसांनी रात्रीचा दिवस केलाच तर जो अनवस्था प्रसंग निर्माण होईल, त्यातून निभवायचा मला तरी एकच मार्ग दिसतो, अन् तो म्हणजे दिवसांची रात्र करणे.

## □ कामज्वराचे टेंपरेचर

रशियात म्हणे अंतरीक्षयान-चालकांसाठी एक 'भीतिमापक यंत्र' तयार झाले असून अंतरीक्ष-प्रवासात त्यांना किती भीती वाटली हे त्याच्यावर नेमके कळेल. पण मी म्हणतो भीती वाटण्यासाठी रशियाच्या अंतरीक्षयानात बसले पाहिजे असे थोडेच आहे ? सदोबा पाटलांच्या आगगाडीत बसले तरी तेवढीच भीती वाटू शकेल. शिवाय भीती फक्त अंतरीक्षयान-चालकालाच वाटते, असे कोणी सांगितले ? कुत्रा मागे लागलेले मांजर, मांजर मागे लागलेला उंदीर, उंदीर मागे लागलेली बाई, बायको मागे लागलेला नवरा या प्रत्येक प्राण्याला भीती वाटते; मग त्यांच्या भीतीचे मोजमाप का नको ? ते काही असले तरी एवढे मात्र खरे की भीती जर मोजता येते तर काम-क्रोध इत्यादी माणसाचे षड्रिपू अन् त्यांची सर्व चिल्ली-पिल्ली कोष्टकात बसवता येतील. आता एखाद्याला कामज्वर चढला तर टेंपरेचर किती असे विचारणे टिंगल ठरणार नाही.

● ● ●

## मुक्काम पुणे

# दैवे लाभला चिंतामणी

नाटककार म्हणून दत्ता कुलकर्णींना नाव नाही. चित्रपट—व्यवसायात साहाय्यक-दिग्दर्शक म्हणून त्यांनी १५ वर्षे कामगिरी बजावली आहे. त्यांचा हा अनुभव लक्षात घेऊन मुंबईच्या एका कामगार नाटचसंस्थेने त्यांच्याकडे नाटकाची मागणी केली. आणि या मागणीतूनच 'दैवे लाभला चिंतामणी' ही नाटचकृती निर्माण झाली. नाटकाची बैठक बरी जमलीय, असा शेरा अनेक मित्रमंडळींकडून मिळाल्यामुळे नाटक स्वत: उभे करण्याची मनीषा लेखकाच्या मनात निर्माण झाली. ज्यांच्या हाताखाली चित्र—व्यवसायात काम केले त्या श्री. दत्ता धर्माधिकारींकडे नाटच-दिग्दर्शनाची जबाबदारी लेखकाने सोपविली. आणि परिणामी कामगार रंगभूमीवर येणारे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर उभे राहिले.

भीमराव देशमुख नावाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याच्या घरी त्याचे फार जुने स्नेही आपला अर्धवट पुतण्या सदानंद याला घेऊन येतात व त्याला आठ दिवसांसाठी भीमरावाच्या घरी ठेवून दिल्ली-मथुरेच्या बाजूस काही कामासाठी निघून जातात.

भीमरावाच्या घरात सर्व सत्ता त्यांच्या द्वितीय कुटुंबाकडे, अन्नपूर्णाबाईकडे असते. प्रल्हाद हा अन्नपूर्णाबाईचा सावत्र मुलगा—क्रिकेटच्या वेडाने पछाडलेला. त्यांची स्वत:ची कन्या मनीषा प्रेमाच्या लफडचात गुरफटलेली. स्वयंपाकपाण्याची जबाबदारी पांडू आचाऱ्यावर आणि वरकामाला अनसूया मोलकरीण. या तऱ्हेवाईक मंडळींना सदानंद नकोसा होता. अनसूयेचा अपवाद वगळता सर्वांकडून त्याच्या वाटचास हेटाळणी येते. त्यातच सदानंद वेडसर होण्यास काही अंशी आपणच जबाबदार आहोत याची माहिती अनसूयेला मिळताच आपुलकी आणि कर्तव्य यांच्या मिश्रणातून तिच्या मनात वेगळयाच भावना निर्माण होऊ लागतात. दिल्लीला गेलेले दादासाहेब तिकडेच मरतात. सदानंद कुलकर्ण्यांच्या घरचा कायमचा आश्रित होतो. आगंतुक पाहुणा हक्काचा नोकर ठरतो.

## पैशाची जादू

दादासाहेबांच्या अचानक मृत्युने सदानंदला जाग येते. अनसूया या संधीचा फायदा घेऊन त्याची महत्त्वाकांक्षा फुलवण्याचा, त्याला धीर देण्याचा प्रयत्न करते. त्याने मॅट्रिकला बसावे म्हणून त्याची मनधरणी करते. त्याच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची तयारी दाखवते. अनूची आई खेडेगावात क्षयाने आजारी असते. 'अचानक धनलाभ' होईल असे कोण्या ज्योतिषाने तिला सांगितलेले असल्याने अनू तिच्यासाठी लॉटरीचे तिकीट काढीत असते. या वेळी पगार वेळेवर न झाल्याने ती सदानंदकडून पैसे घेते व त्याच्यासाठीही एक तिकीट काढते.

निवृत्त भीमराव राजकारणाच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतात. नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांना यश तर येत नाहीच. पण घरावर कर्ज बसते. कुटुंबाची आर्थिक अवस्था अचानक बदलते. आणि तार येते सदानंदला लाख रुपये मिळाल्याची. माणसं तीच, सदानंद तोच, पण वागणुकीत एकदम बदल होतो. सदानंदला स्वतंत्र खोली मिळते. प्रल्हाद, मनीषा, अन्नपूर्णा, भीमराव, सगळे त्याच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करू लागतात. प्रियकराला नकार देऊन मनीषा सदानंदाशी लग्न लावण्यास उभी राहते. अनुची स्थिती अनुकंपनीय होते.सदा आपल्याला विसरला असे तिला वाटू लागते. शहाण्या सदानंदाला बदललेल्या परिस्थितीची जाणीव होते. मिळालेल्या रकमेतून तो ८० हजार रुपये दान करून २० हजारांत भीमरावांचे घर कर्जातून सोडवतो. गेलेले दादासाहेब परत येतात. आपण मेल्याची खोटीच तार त्यांनी केलेली असते. विषावर विषाचा उतारा देऊन सदानंदला शहाणपण येईल, अशी त्यांची अपेक्षा असते. सर्व मंडळींना पश्चात्ताप होतो. दादासाहेबांचा हेतू साध्य होतो. सदानंद मनीषाचे व तिच्या प्रियकराचे सूत जमवून देतो. आणि अनसूयेचा स्वीकार करतो.

## नावीन्य नाही...पण

श्री. कुलकर्णींच्या नाटकात नावीन्य नाही. अचानक आर्थिक बदल होण्याच्या अपेक्षेने मंडळींच्या स्वभावात होणाऱ्या बदलांचे सुरेख दर्शन राजाभाऊंनी त्यांच्या 'पेडगावचे शहाणे'मध्ये घडवले आहे. खुद्द धर्माधिकारींच्या 'महात्मा'मध्ये हा विषय येऊन गेला आहे. परंतु असे असूनही नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरते. कौटुंबिक, प्रापंचिक, सामाजिक नाटकाचा सर्व चालू मसाला नाटकात आहे. आणि जोडीला सर्व कलावंतांचे व तंत्रज्ञांचे प्रामाणिक प्रयत्नही आहेत.

साधी, सोपी परंतु अर्थवाही वाक्यरचना, समर्पक दाखले ही कुलकर्ण्यांच्या संवादांची वैशिष्ट्ये आहेत. आपल्या सुखी जीवनाचं चित्र सदानंद रंगवतो—अनसूयेला तो सांगतो, "सगळं जीवनच छान होते. श्रावणातल्या उन्हाप्रमाणे बाबा होते, चैत्रातल्या चांदण्याप्रमाणे आई होती, त्रिपुरी पौर्णिमेच्या दीपमाळेप्रमाणे दादा होते. प्रकाशमय होते माझे बालपण."

दादासाहेबांच्या मृत्यूची वार्ता आल्यानंतर या दोघांच्यामधील संवादांत सदानंद अनूला सांगतो, " ललाटलेख माणसाला वाचता येऊ नये, म्हणून तो त्याच्या भाळी लिहिलेला असतो. थोडसं अंतर असलेलं कपाळ, पण स्वतःच्या डोळयांनाही ते दिसत नाही. "

सदानंदने जीवनसंघर्षामध्ये पुन्हा पडावे, म्हणून त्याला कळकळीची विनंती करीत असताना अनू म्हणते, " सुरुवातीला त्रास होईल. रोज वादळ व्हायला लागलं तर केळीचं झाडही सरावतं त्या वादळाला. "

प्रल्हादच्या क्रिकेट-वेडाचा फायदा घेऊन कुलकर्णींनी विनोद निर्मितीच्या अनेक जागा अचूक टिपल्या आहेत. मात्र प्रसंगी याचाही अतिरेक झालेला आहे. प्रल्हाद क्रिकेटशौकीन आहे. परंतु त्याचे क्रिकेट वेड त्याच्या मेंदूची तपासणी करण्याची गरज भासावी, इतके ताणण्याचे काही कारण नव्हते.

भीमरावांना निवडणुकीच्या आखाडचात उतरवून, त्यातून विनोदनिर्मिती करण्याचा लेखकांचा प्रयत्न स्तुत्य आहे. परंतु वार्ताहर ' नारद ' द्वारा केलेली विनोदनिर्मिती उच्च अभिरुचीस मानवणारी नाही.

नाटकातील दोन व्यक्तिरेखांची वाढ मनाला पटत नाही. क्रिकेटवेडा प्रल्हाद, विनोदप्रिय प्रल्हाद, सदानंदशी इतक्या निष्ठुरपणे वागेल, हे खरे वाटत नाही. त्याची वडिलांबरोबरची वागणूकही त्याच्या व्यक्तिरेखेस मारक आहे. सदानंदने क्रियाशील व्हावे, त्याच्या प्रयत्नांतून कर्तबगार पुरुष उभा करावा, म्हणून त्याला चैतन्य देणारी अनू त्याला लाख रुपयांचे पारितोषिक मिळताच आपली कामगिरी पूर्ण झाली असे का समजते ? ती म्हणते, " गुलाब फुललाय, आता त्याला बाभळीचं कुंपण हवं कशाला ?" अनूचे हे वर्तन तिच्या उदात्ततेस बाधा आणणारे वाटते. सदानंदशी लग्न करण्याची सुप्त इच्छा पुरी होत नाही, असे दिसताच, तिच्यात हा बदल होतो अशी शंका येते. भीमराव, अन्नपूर्णा व मनीषा यांच्या व्यक्तीरेखा त्या मानाने निकोप वाटतात. सदानंद व अनसूया यांचेमधील संवादांवर लेखकाने खास मेहनत घेतल्याचे जाणवते. सदानंदला बक्षीस मिळाल्याची तार आल्यावर आवश्यक ती उत्सुकता निर्माण करण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

## नेटका प्रयोग, जाणता अभिनय

धर्माधिकारींनी दिग्दर्शक या नात्याने प्रयोगावर बरीच मेहनत घेतली आहे. सर्व कलावंतांकडून त्यांना हवे ते काढून घेण्यात ते बऱ्याच प्रमाणात यशस्वी ठरले आहेत. भावना (अनसूया) व कुमार दिघे (सदानंद) यांनी आपल्या भूमिकांवर भरपूर मेहनत घेतली आहे. भूमिकेशी कमालीचा प्रामाणिकपणा हेच त्यांच्या कामाचे वैशिष्टच. राजा नेने छोटचा कामात मोठी कामगिरी करून जातात. प्रल्हादचे काम चंदू डेगवेकर यांनी निश्चितपणे चांगले केले आहे. परंतु तरीही त्यांची छाप पडत नाही, अतिरंजीतपणा टाळण्याचा प्रयत्न त्यांनी अवश्य करावा. मनीषा

(नयना आपटे) मनाला पटत नाही. पांडू आचारी खरोखरच आचारी वाटतो. हीच त्याच्या कामाची पावती. भीमरावांना दिग्दर्शकाने 'फार्सीकल ट्रीटमेन्ट' का दिली आहे हे समजत नाही. परंतु विठ्ठल पंडूरकर यांनी भीमराव चांगल्या प्रकारे उभा केला आहे. मंदाकिनी भडभडे (अन्नपूर्णाबाई) यांची संवादपद्धती सदोष असून त्या कमी पडत असल्याचे जाणवते. रवीन्द्र भटांना वाव नाही. जे काम आहे त्यात ते छाप पाडू शकत नाहीत.

नाटकाच्या तांत्रिक बाजू पारंपरिक आहेत. प्रयोगिक रंगभूमीचा धसका घेतलेल्यांनी व व्यवसायिकांबद्दल संदेह बाळगणाऱ्यांनी नाटक जरूर पाहावे. त्यांच्या रुचीला मानवणारा प्रयोग पाहिल्याचे समाधान त्यांना निश्चित मिळेल.

— शरद गोखले

मुक्काम मुंबई

---

# अश्रूंची झाली फुले

प्रा. वसंत कानेटकर यांचे प्रभावी कथानक आणि उत्कृष्ट संवाद, कलाकारांचा सकस अभिनय आणि पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे नेटके दिग्दर्शन यांचा मोहक त्रिवेणी संगम ज्यात साधला आहे, ते 'अश्रूंची झाली फुले' हे नाटक पाहत असतानाच प्रेक्षक भान हरपतो. एका वेगळयाच जगात गेल्याचा आनंद त्याला होतो. चालू वर्षात सादर झालेले हे एक उत्कृष्ट नाटक.

सज्जन जेव्हा दुर्जनांच्या आड येतात, त्यांच्या म्हणण्याला रुकार देत नाहीत, तेव्हा ही दुर्जन माणसे त्या सज्जनांचा कसा बळी घेतात आणि मग एक कर्तबगार माणूस भरल्या संसारातून कसा उठतो, हे या नाटकात लेखकाला सांगायचे आहे. पण याचबरोबर जगात प्रेमाला प्रेमानेच प्रतिसाद मिळत नसला तरी कधी तरी अशीही वेळ येते की, या प्रेमाची जाण ठेवणारी माणसेही जगात भेटतात आणि श्रद्धा, माणुसकी, कर्तव्यनिष्ठा यांच्यावरचा माणसाचा उडू पाहणारा विश्वास पुन्हा बसतो हेदेखील कानेटकरांना नाटकातून मांडायचे आहे. यासाठी प्रा. विद्यानंदांची मध्यवर्ती व्यक्तिरेखा उभी केलेली आहे. विद्यानंद स्वतःच्या तत्त्वाशी इतके

चिकटलेले असतात की, संस्थेचा अध्यक्ष त्यांना धमकी देऊन नियमबाह्य, अन्याय्य वर्तन करायला लावीत असला तरी ते त्याची पर्वा करीत नाहीत. आणि त्यामुळेच धनाप्पाशेट त्यांच्यावर उलटतो. विद्यानंदांवर अफरातफरीचा खोटा आळ आणतो. धनाप्पाच्या या कृत्याने विद्यानंद मुळीच दुःखी होत नाहीत; पण त्यांना दुःख होते ते त्यांचा शिष्य शाम हा, त्याच्यावर केलेले उपकार, प्रेम, ममता विसरून जाऊन धनाप्पाबरोबर हातमिळवणी करतो याचेच ! त्यांच्याप्रमाणेच शामनेही मोहाला बळी पडू नये, असे विद्यानंदांना वाटते. पण त्यांचा अंदाज फसतो याचेच दुःख विद्यानंदांना विशेष होते. याचा परिणाम इतका भयंकर होतो की, त्यांचा स्वतः-वरचा विश्वासच उडतो. सत्य, सदाचार या गोष्टींबद्दल त्यांना तिरस्कार वाटू लागतो आणि ते पार बदलतात. तुरुंगातून सुटून येतात ते एकदम बदमाश बनून ! विद्यानंदांचा बालमित्र शंभुमहादेव हा चोरट्या धंद्यात जीवन घालवीत असतो. त्याची ते साथ करतात. अक्कलहुशारीने खूप कमावतात. पण हेच विद्यानंद एक दिवस पोलिसांच्या ताब्यात सापडतात आणि विशेष असा की विद्यानंदांचाच शिष्य लाल्या याच्याच चातुर्याने विद्यानंद पकडले जातात. याच लाल्याला विद्यानंदांनी सन्मार्गावर आणलेले असते, त्याला सत्य, सदाचार आणि कर्तव्यनिष्ठा यांची शिकवण दिलेली असते. आपली शिकवण एका तरी शिष्याने आत्मसात केली, या आनंदात विद्यानंद लाल्याच्या स्वाधीन होतात.

## अनेकांची तन्मयता

कथानकाचे वेगळेपण, त्याला मिळणारी अकल्पित कलाटणी हा या नाटकातील सर्वांत मोठा विशेष ! विद्यानंदाच्या व्यक्तीरेखेभोवती कितीतरी हृदयस्पर्शी प्रसंग निर्माण करून कथानक अशा उत्कृष्टपणे रचले आहे, की प्रेक्षक नाटकाकडे प्रथम-पासूनच आकृष्ट होत जातो. प्रथम प्रयोगाला नाटक चाळीस मिनिटे उशिरा सुरू झाले. प्रेक्षकांच्या चित्तवृत्ती इतक्या कमालीच्या ताणल्या होत्या की दुसरे एकादे सामान्य नाटक सुरू होते तर ते प्रेक्षकांनी तेव्हाच बंद पाडले असते. पण नाटक सुरू होऊन काही मिनिटे गेली नाहीत, तोच प्रेक्षक नाटकाशी इतके समरस झाले, की नाटक उशिरा सुरू केल्याचा राग ते तेव्हाच विसरले. पुढे दोनही अंकांत तब्बल पाऊण पाऊण तासांचा मध्यंतर घेतला, पण प्रेक्षकांना त्याचेही भान राहिले नाही. एकदा नाटक रंगात आले असताना मध्येच सेट लावण्याची ठोकाठोक ऐकू येत होती, तीही प्रेक्षकांना त्रासदायक वाटत होती, पण नाटकाच्या आकर्षणामुळे प्रेक्षक हा सर्व त्रास विसरले.

प्रा. कानेटकरांनी कथेची मांडणी जशी नेटकेपणाने केली आहे, तसेच संवादही दर्जेदार, पकड घेणारे, प्रवाही आहेत. नाटकातील बहुतेक सर्व व्यक्तिचित्रणेही चांगली जमली आहेत. शंभुमहादेवाची प्रेयसी नीलम हिचे व्यक्तिचित्रण मात्र पटत नाही. नीलम नाटकात का ? तिसऱ्या अंकात विद्यानंदांच्या पत्नीसमोर त्यांच्या

गळ्यात पडण्यासाठी तर तिची योजना नाही ? पण विद्यानंद कितीही उलट्या काळजाचा बनला तरी स्वतःच्या पत्नीसमोर मित्राच्या प्रेयसीला गळ्यात पडण्यास हाक मारणार नाही हे नक्की ! एवढाच महत्त्वाचा प्रवेश (तोसुद्धा कृत्रिम वाटतो) सोडला तर नीलम मध्येमध्ये लुडबुड का करते ते कळत नाही. शामची व्यक्ति-रेखाही अस्पष्ट वाटते. इतर व्यक्तिचित्रणे मात्र छान जमली आहेत.

**कलावंतांची कमाल**

अभिनयाच्या दृष्टीने विचार करायचा तर साऱ्याच कलावंतांनी आपले लहान-मोठे काम का असेना, सफाईने वठविले. विद्यानंदांच्या प्रमुख भूमिकेचा आब प्रभाकर पणशीकरांनी फारच उत्तम राखला. विद्यानंदांच्या स्वभावात दोनही छटा त्यांनी ताकदीने उभ्या केल्या. बोलण्यातील घाई हा दोष वगळता त्यांच्या भूमिकेत दोष असा आढळलाच नाही. तुरुंगातील प्रवेश हा त्यांच्या अभिनय गुणाला आव्हान देणारा होता. सज्जन, सात्विक विद्यानंद आणि बदमाश होऊ पाहणारा विद्यानंद हे द्वंद्व, ही तडफड तुरुंगाच्या प्रवेशात सुरेख व्यक्त करतात. चित्तरंजन कोल्हटकर (शंभुमहादेव) यांचा अभिनय म्हणजे नाटकाच्या यशातील फार मोठा वाटा आहे. बोलण्या—वागण्यातील सहजता, वाक्यांची प्रभावी फेक ही त्यांची खास वैशिष्ट्ये ! कितीतरी दिवसांनी त्यांना काही कौशल्य दाखविण्याची भरपूर संधी मिळाली. तिचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. विद्यानंदांच्या पत्नी सुमित्रावहिनी यांच्याबद्दल वाटणारी अफाट माया व पूज्यभाव, तुरुंगाच्या प्रवेशात विद्यानंदांचे होणारे अधःपतन पाहून शंभुमहादेवाची होणारी उलघाल हे प्रसंग ते कमालीच्या सरसतेने करतात. काशिनाथ घाणेकर (लाल्या) यांचे काम तर लाज-वाब आहे. बदमाश गुंड लाल्या इन्पेक्टर झाल्यामुळे त्याच्या चालण्याबोलण्यात एक रुबाब आला आहे. शिवाय कुठलाही ठपका नसल्यामुळे, कुणाचाही मिंधा नसल्याने त्याच्यात एकप्रकारचा करारीपणा आला आहे. हे दोन्हीही स्वभावविशेष तर ते व्यवस्थित दाखवितातच पण त्यांच्या अभिनयाचे खरे कौशल्य व्यक्त होते शेवटच्या प्रवेशात ! ज्यांना आपण देव मानून पूजा केली ते विद्यानंद चोरट्या धंद्यात पडावेत आणि त्यांना पकडण्याचे महाकठीण काम आपल्यावरच यावे हा भाग ते अशा उत्कृष्टपणे सादर करतात की पूर्वीच्या साऱ्या कलावंतांचा, नाटकाचा, त्यांतील कथानकाचा विसर पडतो. प्रेक्षक त्यांच्या कामाला कडाडून टाळी देतात. या घटनेमुळे सारे शरीर जणू पिळवटून निघते आहे हा भागही ते उत्कृष्टपणे दाखवितात. इतकी परिणामकारक भूमिका क्वचितच पाहायला मिळते.

राजा पाठक (घनाप्पा) यांनी आपली भूमिका व्यवस्थित केली असली तरी एक खटकले. घनाप्पाबद्दल जी चीड यायला हवी, संताप यायला हवा, तो येत नाही. शेवटच्या अंकातील त्याचे हृदयपरिवर्तन जास्त ताणलें गेले आहे. पूर्वी एवढा वजन-दार ठरलेला हा घनाप्पा एकदम गोगलगाय कसा ठरतो ? पूर्वी तो जी दडपणे

आणू शकत होता ती एकदम कशी नष्ट होतात हे नीटसे व्यक्त झाले नाही. अर्थात हा दोष काहीसा कानेटकरांचा आहे हे नक्की ! पाठक भूमिका पडू देत नाहीत. धनंजय भावे यांचे शामचे काम तसे थोडे, त्यात मुद्राभिनयालाच वाव. तेवढे काम भावे यांनी चांगले वठविले. सौ. कुसुम कुलकर्णी (सुमित्रा) यांचे काम फारसे मनात भरत नाही. एअरपोर्टवर विद्यानंदांना हातकड्या घालण्याच्या प्रसंगात त्या बऱ्याच कमी पडतात. तेव्हा त्यांचे अस्तित्वच जाणवत नाही. वास्तविक त्यांना वाव भरपूर होता. फैय्याज (नीलम) हिचे काम निरर्थक होते पण तिने आपल्याकडून काही कमी पडू दिले नाही. सीताराम सामंत (तात्या) आणि आप्पा गजमल (श्री. शा. क्षीरसागर) यांच्या भूमिका एकदम वेगळ्या, काहीसा रिलीफ देणाऱ्या ठरल्या. दोघांनी काही जागा सरसपणे सादर केल्या. हे दोघे प्राध्यापक म्हणजे अंमलदारमधील हरभट नारभट वाटतात ! त्यांचा दर्जा काहीसा घसरला आहे असे वाटते.

दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर यांचा उल्लेखही अगत्याने केला पाहिजे. दिग्दर्शकाला लेखक पुरेपूर समजावा लागतो म्हणतात, ते दारव्हेकरांनी उत्तम तऱ्हेने दाखविले. प्रयोग बसविण्यामागील मेहनत वारंवार जाणवत होतीच. पण त्यातही एक विशिष्ट दृष्टी होती. आणि म्हणूनच प्रत्येक प्रसंग उठून दिसला हे विसरता येत नाही.

सरकत्या रंगमंचाचा वापर मात्र अनावश्यक वाटतो. त्यांत नावीन्य आहे. अशा नावीन्यपूर्ण गोष्टी आल्या पाहिजेत, त्या प्रगतीचे द्योतक आहेत, हे जरी खरे असले तरी त्या सहज वाटल्या पाहिजेत. इथे सरकत्या रंगमंचासाठीच नाटक केले असे वाटले. साहजिक नाटक तंत्राच्या आहारी गेले. नाटकासाठी तंत्र न येता तंत्रासाठी नाटक आले. नाटकाच्या परिणामातही या रंगमंचाने कसलीही भर टाकली नाही. मग त्याचा उपयोग कशाला ? व्यर्थ खटाटोप का ?

रघुवीर तळाशीलकर यांचे नेपथ्य उत्तम आहे. एअर पोर्टचा सीन आणि तुरुंगाचा सीन तर फारच प्रेक्षणीय आहे. बागेच्या सीनमधील मागील पार्श्वभूमी कृत्रिम वाटली. धनाप्पा शेटजीचा हॉलही अगदीच सामान्य होता. अर्थात एअर पोर्ट आणि तुरुंग हे दोन सीन उभे केल्याबद्दल त्यांचे खास अभिनंदन ! पार्श्वसंगीत ही गोष्ट फारशी उठून दिसत नाही. कदाचित नाटकाचा प्रभावच इतका असेल की ते जाणवले नसेल.

— सौ. जयश्री दामले



# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

दिनांक १८ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर १९६६

**मेष :** आपला राशीस्वामी अनुकूल येण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे अडीअडचणी हळूहळू दूर होतील. रविमहाराज षष्ठस्थानातून परिभ्रमण करीत आहेत. त्यामुळे विरोधकांची तोंडे बंद होतील. परंतु संततीच्या बाबतीत मात्र काळजी घ्यायला हवी. तारीख १९ व २० ह्या तारखा प्रतिकूल आहेत. कोणतेही नवीन व्यवहार करू नयेत. कवी, लेखक, कलावंत यांना शुक्राचार्यांची कृपा असल्यामुळे हा सप्ताह अनुकूल आहे. दि. २४ आपणांस शुभ आहे. ज्यांचे कृत्तिका नक्षत्र प्रथम चरण असेल, त्यांचा अनिष्ट काल संपत आला आहे. या सप्ताहात आपणांस मातुल घराण्यापासून फायद्याचा योग आहे. कोर्टकामे, स्थावरासंबंधीची कामे लांबणीवर टाकावीत. महिलांना सांसारिक कटकटींमुळे मानसिक समाधान मिळणार नाही.

**वृषभ :** आपला राशीस्वामी सुखस्थानात आहे व त्याच्या जोडीला रवि–बुध आणि गुरू यांचा शुभयोग आहे. ज्यांचे वृषभ लग्न व वृषभ रास असेल, त्यांना हा सप्ताह उत्तम जाईल. येणे असलेले पैसे वसूल होऊन अकस्मात शुभ घटना घडतील. संततिसौख्य चांगले मिळेल. मुले मनाजोगती वागतील. पत्नीच्या तब्येतीस मात्र थोडासा त्रास होऊन थोडाफार द्रव्यखर्च करावा लागेल. दि. २२–२३ प्रतिकूल आहेत. व्यापारात व धंद्यांत उत्तम फायदा मिळेल. कलावंतांना हा आठवडा फार फायदेशीर आहे. अकारण द्रव्यखर्चाचा मात्र योग आहे. बुद्धीच्या शक्तीवर आपण कोणतेही कार्य हे सिद्ध करून दाखवू शकाल.

**मिथुन :** आपला राशीस्वामी सुखस्थानात जरी स्वगृही आहे. तरी शनि–रवीच्या अशुभ योगामुळे अकारण अडीअडचणी निर्माण होतील. द्रव्यखर्च भयंकर होऊन तारांबळ उडेल. नको तो संसार, असे कित्येक वेळी वाटेल. अडचणींतून मार्ग काढावा की, आणखी अडचणी निर्माण होत आहेत, अशी स्थिती आहे. निदान १ ऑक्टोबरपर्यंत तरी आपणांस असा काळ काढावा लागेल. प्रतिकूल काळात मन शांत ठेवून त्यास धैर्याने तोंड देणे इष्ट. दि. २४–२५ हे दिवस ईश्वर चिंतनात घालवावेत. कोणत्याही तऱ्हेचे नवीन व्यवहार करू नयेत. गजाननाच्या कृपेने अनिष्ट सप्ताह हां हां म्हणता निघून जाईल.

**कर्क :** गुरु–मंगळाची अनुकूलता त्यात रवि–बुधाची जोड म्हणजे दोन पवित्र नद्यांचा संगमच. हा सप्ताह आपणांस सर्वतोपरी इष्ट आहे. स्वपराक्रमाने पुढे येण्यास चांगला वाव आहे. कलावंतांना भरपूर प्राप्ती. व्यापारात फायदा, मित्रांचे सहकार्य, दि. २४–२५ शुभ दिवस. २६–२७ प्रतिकूल आहेत. मन शांत ठेवा. क्षुल्लक कारणांवरून खटके उडतील.

या सप्ताहात पैशाची चांगली स्थिती राहणार आहे. त्यामुळे कौटुंबिक आनंद मिळेल. पैशाची प्राप्ती उत्तम असल्यानंतरच गृहिणी मनाप्रमाणे वागतील, यात नवल काय? एवंच हा सप्ताह आपणांस सुखाचा व समृद्धीचा असा आहे.

**सिंह:** आपणांस रवि–बुध जोडी अनुकूल आहे, त्यामुळे हळूहळू परिस्थितीत सुधारणा होईल व लवकरच मंगळ अनुकूल येणार आहे. त्यामुळे आशादायक वातावरण निर्माण होईल. अनिष्ट काल हळूहळू संपत आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगली दक्षता घ्यावी लागेल. आपला मूळचा स्वभाव तापट व मानी. त्यामुळे आपणांस व्यवहारात पुष्कळ वेळा अपयश येईल. सद्ग्रंथांचे वाचन करून मोठी माणसे सांगतील त्या मार्गानेच जाणे इष्ट आहे. प्रवास शक्य तो टाळावा. संयमाने वागा; अन्यथा आरोग्यात बिघाड निर्माण होईल. नवीन कुठलेही आर्थिक व्यवहार करू नयेत. गजाननाची उपासना करावी. म्हणजे सर्व संकटांतून मुक्त व्हाल.

**कन्या:** आधीच गुरु–मंगळ अनुकूल, त्यात रवि–बुधाचे साहाय्य. मग इच्छित कार्यास सिद्धी का मिळणार नाही? आता आपण जरी कोणतेही कार्य हाती घेतलेत तरी त्यात यश हे हमखास येणारच. लोकांस 'प्रयत्नाने कोणतेही कार्य सिद्ध होते' असे तत्त्वज्ञान सांगाल. परंतु कोणत्याही कार्यात ग्रहांची अनुकूलता असल्याखेरीज यशप्राप्ती होणार नाही, बरं का? दि. २४–२५ हे दिवस आपणांस फारच शुभ आहेत. पतिराजांना होत असलेल्या अर्थप्राप्ती व प्रतिष्ठेमुळे महिला त्यांची स्तुती करतील. व्यापारात, व्यवसायात उत्तम फायदा. आकस्मिक धनाचा लाभ होईल. कलावंत, लेखक आणि विद्यार्थी यांना हा सप्ताह फारच शुभ आहे. सर्व गोष्टी मनाजोगत्या होणार असल्याने वातावरण आनंदी राहील.

**तूळ–** गुरू नि मंगळ हे दोन्ही ग्रह आपणांस अनुकूल आहेत. रवी बुध, १२ वे व चंद्राजवळ केतू. त्यामुळे अर्थप्राप्तीत अडीअडचणी व मानसिक अपयश. हा सप्ताह आपणांस थोडा संयमानेच काढावा लागेल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे धीर धरणे. प्रतिकूल काळ असला म्हणजे काही गोष्टी लांबणीवर टाकणे किंवा वेळ मारून नेणे, याशिवाय गत्यंतर नाही. आपणांस फार दिवस त्रास सहन करावा लागणार नाही. अगदी अल्पकाळच प्रतिकूल आहे. प्रवासाचा योग आहे. तब्येतीस जपा. आपणांस जो तो तत्त्वज्ञान सांगेल; परंतु घाबरण्याचे कारण नाही. हां हां म्हणता आपला हा प्रतिकूल काळ निघून जाईल.

**वृश्चिक–** भाग्यात गुरु-मंगळ व एकादशात रवि-बुध असे ग्रहांचे अनुकूल सामर्थ्य असल्यानंतर हा सप्ताह आपणांस अनुकूल जाणारच यात नवल नाही. नोकरीत बढती, व्यापार–धंद्यामध्ये फायदा, कलावंतांना उत्तम फायदा. दिनांक २४, २५ आपणांस फारच शुभ आहे. मित्रांचे सहकार्य उत्तम मिळेल. पत्नी मनाजोगती वागून, विद्यार्थ्यांना विद्येत चांगले यश मिळेल. बरेच दिवस रेंगाळत पडलेली कामे

झटपट निकालात निघून त्यांत यशप्राप्ती होईल. महिला आपल्या पतिराजांशी प्रेमळपणे वागतील. नवीन वस्तूंची खरेदी कराल. घरात आनंदी वातावरण राहून दूरचा प्रवास किंवा सहलीचे योगही येतील.

**धनू**– गुरु-मंगळ जरी प्रतिकूल असले तरी रवि–बुधाचे साहाय्य असल्यामुळे काही गोष्टींत यशप्राप्ती होईल. अर्थात त्यासाठी झगडावे लागेल. ते सहजसाध्य नाही. लोकांनी किती जरी टीका केली तरी त्याकडे दुर्लक्ष करून नेटाने प्रयत्न करावा, म्हणजे आपल्या गोष्टी मार्गावर येतील. दिनांक १९ व २० या दोन्ही तारखा आपणांस प्रतिकूल आहेत. म्हणून या दिवशी कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत. संततीच्या प्रकृतीस जपावे. विद्यार्थ्यांचे अभ्यासात मन लागणार नाही. मन बेचैन होईल. आपले म्हणणारेच घात करतील.

**मकर**– सप्तमात गुरु–मंगळ व भाग्यात रवि–बुध व त्यांस दिनांक २४–२५ ला चंद्राचे साहाय्य. म्हणजे उत्तमच अनुकूलता. आता कोणत्याही कार्यात यशप्राप्ती निश्चित. नोकरीत बढती. मानसिक स्वास्थ्य. व्यापाऱ्यांस उत्तम फायदा. मात्र दिनांक २१ व २२ प्रतिकूल दिवस असल्यामुळे कोणतेही कार्य करू नये. त्यात यश मिळणार नाही. ज्यांचे उत्तराषाढा नक्षत्र द्वितीय चरण असेल त्यांना हा सप्ताह फारच शुभ आहे. या सप्ताहात मंगलमूर्तीची पूर्ण कृपा लाभणार आहे. कुटुंबात क्षुल्लक वादविवाद मात्र होतील. बाकी विशेष त्रासाचा योग नाही. आपल्या मनातील महत्त्वाकांक्षेला मूर्त स्वरूप प्राप्त होईल.

**कुंभ**– षष्ठात गुरु–मंगळ व अष्टमात रवि–बुध व त्यांच्याशी शनीचा प्रतियोग त्यामुळे 'जीवन जगणेचि नको' अशी मन:स्थिती होईल. कुटुंबीय मंडळींच्या इच्छा तृप्त करता येणार नाहीत. त्यामुळे वादविवाद निर्माण होतील. कोणतेही कार्य करावयास जा, तेथे अपयश मिळेल. पैशाशिवाय जीवन नाही व त्याच्या अभावामुळे मनस्ताप होईल. दैव प्रतिकूल असल्यामुळे कितीही प्रयत्न केला तरी त्यात यश नाही. दिनांक २४, २५ प्रतिकूल.

**मीन**– पंचमात गुरु–मंगळ, सप्तमात रवि–बुध व त्यास दिनांक २४–२५ चंद्राची अनुकूलता. त्यामुळे हा सप्ताह आपणांस सुखप्रद आहे. संतती आपल्या मनाप्रमाणे वागेल. पत्नीचे उत्तम सहकार्य. नोकरीत बढती, व्यावसायिकांना व्यवसायात उत्तम अर्थप्राप्ती. विद्यार्थ्यांना विद्येत उत्तम यश. प्रवासाचा योग, अकास्मात शुभ घटना. ज्यांचे पूर्वा भाद्रपदा नक्षत्र चतुर्थ चरण असेल, त्यांना हा सप्ताह फारच चांगला आहे. कलावंत, कवी, लेखक यांना व्यवसायात उत्तम प्राप्ती मिळेल. महिलांना दि. २४, २५ तारखा मनाजोगत्या जातील. कोर्टकामाच्या तारखा पुढे ढकलाव्यात. एकंदरीत हा सप्ताह निश्चितच अनुकूल आहे. विरोधकांचे विरोध नाहीसे होऊन तेच आपली प्रशंसा करतील.

● ● ●

## अफलातून गंमत

# कॅरी ऑन स्पाइंग

नुकताच 'कॅरी ऑन स्पाइंग' हा धमाल चित्रपट पाहिला. एकदम अफलातून. हा चित्रपट म्हणजे निव्वळ गंमत आहे. हास्यविनोद, मूर्खपणा, बावळटपणा, सगळा गोंधळ यांनी खच्चून भरलेला हा शुद्ध वेडेपणा. हा वेडेपणा असला तरी त्यातून पुरेपूर ओसंडतो आहे उपहास. ही एक थट्टेखोरपणे केलेली थट्टा आहे-जेम्स बाँड, धर्तीच्या 'ओ, ओ... सेव्हन' चित्रपटांची.

'जेम्स बाँड' हा इयान फ्लेमिंगच्या कादंबऱ्यांचा अमर नायक. 'अमर' या शब्दाला येथे विशेष अर्थ आहे. 'आपुले मरण' क्षणोक्षणी 'पाहिले म्यां डोळा' असे जिवावरचे प्रसंग गुदरूनही त्यातून निभावणारा हा जेम्स बाँड गुप्तहेर, त्याला अमर म्हणावयाचे ते याचसाठी. इयान फ्लेमिंगच्या गुप्तहेरकथांना जगभर अफाट लोकप्रियता मिळाली. त्यावर चित्रपट निघाले. 'डॉ. नो,' 'फ्रॉम रशिया वुइथ लव्ह' या जेम्स बाँडवरील चित्रपटांमुळे पाश्चात्य चित्रसृष्टीत गुप्तहेर चित्रपटांचे पेवच फुटले. 'पॅनिक इन बँकॉक,' 'सिक्रेट एजंट एफ् एक्स १७,' 'ओ. एस्. एस्. ११७', 'एस्पियोनेज इन लिस्बन,' 'इंटरपोलकोड-८,' 'दॅट मॅन इन इस्तंबूल,' 'बर्लिन अपॉइंटमेंट फॉर स्पाइज' असे अनेक चित्रपट निर्माण झाले. या चित्रपटांचा तोंडावळा जवळ जवळ सारखाच. एखादा शास्त्रीय फॉर्म्युला किंवा सरकारी महत्त्वाचे सिक्रेट चोरीस जाणे आणि चलाख गुप्तहेराने ते मोठ्या शिताफीने परत मिळविणे अशा आशयाची कथा बहुतेक चित्रपटांची आहे. त्याचीच प्रच्छन्न टिंगल 'कॅरी ऑन स्पाइंग 'मध्ये आहे.

'ब्रिटिश ऑपरेशनल सिक्युरिटी हेडक्वार्टर्स' (बी. ओ. एस्. एच्.) मधून एक अत्यंत महत्त्वाचा 'एक्स वन' फॉर्म्युला चोरीस जातो. 'सोसायटी फॉर टोटल एक्स्टिंक्शन ऑफ नॉन कन्फर्मिंग ह्यूमन्स' (स्टेन्च) या शत्रुसंघटनेचा हेर हा फॉर्म्युला पळवून नेतो. या दोन संघटनांच्या नावांतच पुरेपूर उपहास आहे. इयान फ्लेमिंगच्या कादंबऱ्यांतील 'स्मर्श' संघटनेचेच हे विडंबन! फॉर्म्युला चोरीस गेल्यामुळे एकच गोंधळ उडतो. बी. ओ. एस्. एच्. मधील हा पहिलाच प्रसंग. फॉर्म्युला आणण्याच्या कामगिरीवर पाठविण्यासाठी हेरही नसतात. तेव्हा तीन शिकाऊ गुप्तहेर आणि त्यांचा शिक्षक या चौघांवर हा फार्म्युला परत मिळवून

आणावयाचे काम सोपविले जाते. ते ' अवर मॅन इन व्हिएन्ना 'शी संपर्क साधतात. ' टॉप सिक्रेट ' असा शिक्का असलेला फॉर्म्युल्याचा कागद दोनदा या गुप्तहेरांच्या हाती येतो; परंतु गबाळेपणे तो त्यांच्या हातून निसटतो किंबहुना आपल्याला हवा असलेला कागद तो हाच याची त्यांना जाणीवच होत नाही. मग एकच धावाधाव सुरू होते. कागदाच्या शोधात हे नवशिके गुप्तहेर अल्जीयर्सला जातात. तेथे ' हकीन्स फन हाऊस 'मध्ये त्यांच्या हातात जवळ जवळ टॉप सिक्रेट कागद येतो– परंतु, थांबा. तो कागद हातात असा मिळता तर मग गुप्तहेर चित्रपट कसला? संकटे अजून यायचीच असतात. हे सारे गुप्तहेर डॉक्टर क्रोच्या ( डॉक्टर ' नो ' च्या धर्तीवर ) तडाख्यात सापडतात. अत्यंत अद्ययावत् अशा प्रयोगशाळेत–साक्षात् मृत्यूच्या दाढेत–गुप्तहेरांचा प्रवास होतो आणि अखेरीस त्यातूनही ते सुटतात– शिताफीने नव्हे तर नशिबाने !

पीटर रॉजर्सचा हा चित्रपट भरला आहे अशा क्षणाक्षणाला वावणाऱ्या घटनांनी. गुप्तहेर चित्रपटांतील नायक ट्रॅन्समीटर, कॅमेरा आदि वस्तू टायच्या पिनमध्ये, चपम्याच्या काडीत अशा ठिकाणी लपवतात त्याचीही येथे भरपूर चेष्टा केली आहे. ' कॅरी ऑन स्पाइंग 'मधील एक नट स्त्री-वेश घेतो आणि तो ट्रान्समीटर दडवतो आपल्या नकली वक्षस्थळात ! या चित्रपटाला काही साधावयाचे नाही. अभिजात कलानिर्मिती हेही त्याचे ध्येय नाही. चार बावळट, बेंगरूळ इसम ' जेम्स बाँड ' धर्तीच्या चित्रपटांत काम करू लागले तर ते काय धमाल उडवून देतील त्याचे हे मिस्किल चित्रण, मग तुमचा विश्वास बसो वा न बसो ही आहे एक निव्वळ, निर्मळ करमणूक !

• • •

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

डॉ. अवसरे.... [पृष्ठ ३ वरून]

कारावासाची शिक्षा ठोठावली (१ लाहोर ४४० पाहा.)

तिसरी केस कलकत्ता हायकोर्टाची. रामकुमारी ही दुखीसिंग याची बायको. दोघेही हिंदू. विवाह झाल्यानंतर ४ वर्षांनी तिने मुसलमान धर्म स्वीकारून एका मुसलमानाशी लग्न केले. त्या बाईसही शेवटी शिक्षा भोगावी लागली. (१८ कलकत्ता २६४ पाहा)

ही सविस्तर माहिती देण्याचा उद्देश हा की, आपल्या अंकातील डॉ. अवसरे यांच्या बाबतीतील लेख वाचून एखाद्या व्यक्तीचा चुकीचा समज होऊ नये व त्यास कायद्याची योग्य माहिती मिळावी.

**बाळकृष्ण के. सोनार, ॲडव्होकेट, मुंबई**

स. न. वि. वि.

माझे वकील मित्र श्री. बाळकृष्ण के. सोनार यांचा लेख आपण माझ्याकडे पाठविला तो वाचला. श्री. सोनार यांच्याविषयी त्यांचा सहव्यवसायी या नात्याने मला असलेल्या आदरास बाध न आणता, माझे विचार स्पष्टपणे मी पुढे कळवीत आहे.

पहिली पत्नी हयात असताना दुसरा विवाह केल्यास घडणारा गुन्हा इं. पि. को. च्या ४९४ कलमाच्या कक्षेत येतो. मात्र आरोपीला दोषी ठरवण्यापूर्वी तो कायदेशीररीत्याच गुन्हेगार ठरला पाहिजे. (Not only Justice, but Justice according to Law) एखाद्या माणसाने सरळ सरळ गुन्हा केलेला असूनदेखील तो कायद्यात सांगितलेल्या तंतोतंत स्पष्टीकरणामध्ये बसणारा नसेल तर गुन्हेगार आरोपी निर्दोष (!) सुटू शकतो.

प्रस्तुत विषयात इं. पि. को. ४९४ कलम काय म्हणते हे मूळ इंग्रजीतच पाहणे अधिक योग्य ठरेल. ते कलम पुढीलप्रमाणे आहे.

494 : Whoever, having a husband or wife living, marries *in any case in which such marriage is void by reason of its taking place during the life of such husband or wife,* shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to seven years, and shall also be liable to fine.

'माणूस' च्या वाचकांनी वरील द्विभार्या प्रतिबंधक व शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याची व्याख्या स्वल्पविरामांकडे विशेष लक्ष देऊन बारकाईने वाचावी. वाचकांच्या मदतीकरता महत्त्वाचा भाग मी तिरप्या ठशात दिला आहे. यावरून आरोपीस पहिली पत्नी हयात असताना द्वितीय विवाह केल्याबद्दल शिक्षा देण्यापूर्वी दोन

महत्त्वाच्या मुद्यांचा विचार कोर्टास करावा लागतो.

(१) द्वितीय विवाहप्रसंगी प्रथम पत्नी हयात असली पाहिजे.

(२) द्वितीय विवाह करणाऱ्या व्यक्तीला लागू असलेल्या कायद्याप्रमाणे त्या व्यक्तीने प्रथम पत्नी हयात असताना केलेला द्वितीय विवाह हा रद्दबातल ठरत असला पाहिजे.

शिवाय इं. पि. को. कलम ४९४ हे हिंदू स्त्री-पुरुष, मुसलमान स्त्रिया व पार्शी—ख्रिश्चन स्त्री-पुरुष यांनाच दंडनीय ठरेल. मुसलमान पुरुषांना त्यांच्या व्यक्तिगत कायद्याप्रमाणे एकाच वेळी ४ विवाह करण्याचा अधिकार त्यांच्या कायद्या-प्रमाणे आहे.

समजा, अ ह्या हिंदू माणसाने ब ह्या हिंदू मुलीशी विवाह करून नंतर त्याने मुसलमान धर्म स्वीकारला व 'क' ह्या मुलीशी द्वितीय विवाह केला तर अ हा (इं. पि. को. ४९४ चा तिरप्या ठशातील भाग पाहा) शिक्षेस पात्र नाही. कारण मुसलमान धर्माप्रमाणे दुसरा विवाह करणे हा त्याला लागू पडत असलेल्या व्यक्ति-गत कायद्याप्रमाणे त्याचा हक्क आहे.

मात्र अशा परिस्थितीत १९५५ च्या विवाह कायद्याप्रमाणे ह्या 'अ' च्या प्रथम हिंदू पत्नीस अ पासून घटस्फोट घ्यायचा कायदेशीर अधिकार मिळतो. (According to Hindu Law an apostate is not absolved from all *CIVIL* obligations, but now by the Hindu Marriage Act S. B (1) (ii), a Hindu can obtain a divorce) याचा अर्थ अ ने फौजदारी गुन्हा केला आहे असा मात्र नव्हे ! ( i. it gives a *GROUND* to his previous wife for obtaining divorce from him ( पाहा : The Law of Crimes, 20th edition by Ratanlal & Dhirajlal. pages 1254 to 1266)

याच संदर्भात माझे वकील मित्र श्री. सोनार (My learned friend) यांनी दिलेल्या तीन प्रमाणित निकालांची चर्चा करणे योग्य ठरेल.

श्रीमती गंगा वि. श्री. गोसावी (मुंबई हायकोर्ट)

नंदी वि. तिचे पहिले पती (लाहोर हायकोर्ट)

रामकुमारी वि. दुखीसिंग (कलकत्ता हायकोर्ट)

हे तिन्ही खटले व त्यांचे निकाल प्रस्तुत संदर्भात गैरलागू आहेत; कारण या तिन्ही खटल्यांत हिंदू स्त्री ने मुसलमान धर्म स्वीकारून द्वितीय विवाह केलेला आहे व मुसलमान धर्माप्रमाणे मुस्लीम स्त्रीला पहिला पती हयात असताना दुसरा पती करता येत नाही. याचाच अर्थ द्वितीय विवाह करते वेळी त्यांना लागू असलेल्या (मुस्लीम) कायद्याप्रमाणेदेखील त्यांची लग्ने रद्दबातलच ठरत होती. त्यांना शिक्षा झाली ती केवळ धर्मांतर करून द्वितीय विवाह केला म्हणून नव्हे तर मुस्लीम स्त्रीला पहिला पती हयात असताना द्वितीय विवाह करण्याचा अधिकार नाही.

म्हणून धर्मांतर करून केलेला द्वितीय विवाह हा शिक्षेस पात्र असतोच असे नाही. द्वितीय विवाह करणारी व्यक्ती ज्या वेळेला असा द्वितीय विवाह करते त्या वेळी त्या व्यक्तीला लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्याप्रमाणे दुसरा विवाह करण्याचा हक्क असेल तर ती व्यक्ती निर्दोष ठरते. (पाहा : A. I. R. 1950 Mys. 26; 8 Ind. cas 572)

जाता जाता केवळ गंमत म्हणून एक प्रमाणित निकाल वाचण्यासारखा आहे. या निकालात अ ह्या हिंदू माणसाने ब ह्या मुलीशी लग्न केले व तिच्या पालकाच्या संमतीने तिचा त्याग केला. पुढे दिलजमाई (!) होऊन त्याने पुन्हा तिच्याशीच लग्न केले. मात्र हा गोडवा बराच महाग पडला ! कारण पहिले कायदेशीर लग्न कायदेशीररीत्याच रद्दबातल करून न घेता पुन्हा तिच्याशीच दुसरे (?) लग्न केल्याबद्दल अ ला इं. पि. को. च्या ४९४ कलमाखाली शिक्षा ठोठावली गेली ! (पहा : A. I. R. 1927, cal 480)

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होईल की डॉ. अवसरे यांच्या द्वितीय विवाहाबद्दल ता. २० ऑगस्ट १९६६ च्या 'माणूस'मध्ये पान १९–२० वर आपण केलेले "फक्त हिंदू असल्याने दुसऱ्या विवाहाला कायद्याने बंदी आहे हे लक्षात येताच त्यांनी तात्पुरता मुसलमान धर्म स्वीकारला व महाराष्ट्र सरकारची फट-फजिती केली" हे विधान यथायोग्य, समर्थनीय व कायद्यास धरून आहे.

याशिवाय आरोपीच्या प्रथम पत्नीव्यतिरिक्त इतर कोणास कोर्टाकडे धाव घ्यायचा अधिकार आहे की नाही ? त्याच्या पहिल्या विवाहाचे कायदेशीर स्वरूप (Valid Marriage) कसे होते ? दुसऱ्या विवाहाचे स्वरूप कसे आहे ? हे कायद्याचे महत्त्वाचे मुद्दे आरोपीच्या बचावासाठी हात जोडून उभे असतात. कधी कधी आरोपी स्वतः दुसरे लग्न केल्याचे कबूल करतो. पामर लोकांना ते नवरा-बायकोच वाटतात पण बचावाचा वकील Whoever.........Marries......या व्याख्येतील Marries या शब्दाची कायदेशीर चिरफाड करून आरोपीचे पहिले किंवा दुसरे लग्न हे "लग्न" नव्हते असे सिद्ध करून आरोपीची सुटका करतो. कारण सर्वसामान्य लोकांना लग्न झालेले आहे असे भासवून, स्वतः तसे कबूल करून, मात्र त्याच वेळी दुसरे लग्न हे कायदेशीर लग्न नाही अशी फट ठेवून विवाहित पुरुष पहिल्या पत्नीला सोडून दुसऱ्या स्त्रीबरोबर वैवाहिक जीवन जगू शकेल. कारण 'तसं' राहणं हा गुन्हा नव्हे !

वकिली व्यवसायात शेवटची ॲथॉरिटी अशी कधीच नसते. माझ्या अत्यल्प कायदे-विषयक ज्ञानाची मला जाणीव आहे. हे लेखवजा पत्र श्री. सोनार वकील कसे चुकत आहेत हे दर्शविण्यासाठी लिहिलेले नसून एका महत्त्वाच्या कायदेशीर मुद्याची प्रामाणिक चर्चा व अधिकृत स्पष्टीकरण व्हावे यासाठी लिहिले आहे.

**माधव कानिटकर, ॲडव्होकेट, मुंबई**

[या विषयाची चर्चा येथे समाप्त होत आहे. —सं.] ●

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं




मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**